सुविचार

परमात्मा पापी से भी प्रेम करते हैं । सभी परमात्मा के बच्चे हैं, इसलिए मुझे परमात्मा के किसी भी बच्चे से नफरत करने का क्या अधिकार है ?

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. ५ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## वोट फॉर नोट

## सुप्रीम कोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

नवी दिल्ली : संसद किंवा विधीमंडळ सभागृहात भाषण करण्यासाठी, मत देण्यासाठी खासदार आणि आमदार लाच घेत असतील तर त्यांना कायद्याचे संरक्षण द्यावे का? सुप्रीम कोर्टाने याबाबत एक मोठा निर्णय दिला आहे. मताच्या बदल्यात पैसे देण्याबाबत सुप्रीम कोर्टाकडून हा ऐतिहासिक निकाल देण्यात आला असून १९९८ च्या नरसिंह राव प्रकरणातील आपला निकाल बदलून आमदार खासदारांना लाचखोरी आणि भ्रष्टाचार प्रकरणी कायदेशीर संरक्षण देण्यास नकार दिला आहे.

'वोट फॉर नोट' प्रकरणी सुप्रीम कोर्टाने निर्णय देताना विधानसभेत प्रश्न्न उपस्थित करण्यासाठी तसेच विधेयकांच्या बाजूने मतदान करण्यासाठी लाच घेणाऱ्या आमदार खासदारांचा बचाव करणारा कायदा रद्द करण्यात आला आहे. याआधी लाच घेऊन मतदान करणाऱ्या खासदार किंवा आमदारांवर कारवाई करता येणार नाही, असा निकाल १९९८ मध्ये देण्यात आला होता. हाच निकाल आता सुप्रीम कोर्टाने फिरवला आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निर्णय बदलला आहे.

सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील सात सदस्यीय घटनापीठाने एकमताने सोमवारी हा निकाल दिला. त्यामुळे आता या गुन्ह्यासाठी लोकप्रतिनिधींना कोणतीही सूट दिली जाणार नाही.

'नरसिंहरावांच्या निर्णयाचा अर्थ कलम १०५/१९४ च्या विरोधात आहे. त्यामुळे लाचखोरीला संसदीय विशेषाधिकारांचे संरक्षण नाही' असे सरन्यायाधीशांनी हा निकाल देताना म्हटले आहे. २६ वर्षांनंतर सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने १९९८ च्या निर्णयाचा आढावा घेतला आहे. या एकमताने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात, सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील



खंडपीठाने विधिमंडळाच्या सदस्याने केलेला भ्रष्टाचार किंवा लाचखोरी सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा भंग करते. लाचखोरीला कोणत्याही संसदीय विशेषाधिकाराचे संरक्षण नाही, असे स्पष्ट केले होते.

**पंतप्रधान मोदींनी केले निर्णयाचे स्वागत**

सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोरदार स्वागत केले आहे. यासाठी चक्क ट्विट करत त्यांनी म्हटले आहे की, स्वागतम! सन्माननीय सुप्रीम कोर्टाने हा खूपच चांगला निर्णय दिला आहे. यामुळे स्वच्छ राजकारणाची खात्री मिळेल अन् लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ होईल.

## भाजपने जिंकली

### उपमहापौर पदाची निवडणूक

नवी दिल्ली : महापौरपदाच्या निवडणुकीतील मोठ्या घोटाळ्यानंतर आता भाजप-ने उपमहापौरपदाची निवडणूक जिंकली आहे. ही निवडणुकही काँग्रेस-आम आदमी पार्टी आणि भाजप अशी थेट निवडणूक होती.

या निवडणुकीत वरिष्ठ उपमहापौरपदासाठी इंडिया आघाडीचे नगरसेवक गुरप्रीत सिंह गाबी आणि भाजपचे नगरसेवक कुलजीत सिंह संधू यांच्यामध्ये निवडणूक झाली. तर उपमहापौरपदासाठी इंडियाच्या निर्मला देवी आणि भाजपचे नगरसेवक राजिंदर शर्मा यांच्यामध्ये निवडणूक झाली.

वरिष्ठ उपमहापौरपदाच्या निवडणुकीत देखील आप आणि काँग्रेसच्या आघाडीचे एक मत रद्द झाले. या निवडणुकीत भाजपला १९ मते आणि आघाडीला १६ मते मिळाली, तर एक मत रद्द झाले. असे सांगितले जात आहे की, अकाली दलाचे हरदीप सिंह यांनी पुन्हा एकदा भाजपला मत दिले आहे.

## तरुणांना रोजगार मिळू नये ही मोदींची गॅरंटी



नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष कंबर कसून तयारीला लागले आहेत. अनेक पक्षांनी उमेदवारी यादी जाहीर केली आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी तीव्र होताना पाहायला मिळत आहेत. काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा सुरू आहे. देशातील बेरोजगारीवरून राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट करत केंद्र सरकारवर टीका केली.

देशातील तरुणांनो, एक गोष्ट लक्षात घ्या! नरेंद्र मोदींचा हेतू रोजगार देण्याचा नाही. नवीन पदे निर्माण करणे तर दूरच, केंद्र सरकारच्या रिक्त पदांवरही भरती केली जात नाही. केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीचा विचार केला तर ७८ विभागांमध्ये ९ लाख ६४ हजार पदे रिक्त आहेत. महत्त्वाच्या खात्यांवर नजर टाकली तर रेल्वेत २.९३ लाख, गृह मंत्रालयात १.४३ लाख आणि संरक्षण मंत्रालयात २.६४ लाख पदे रिक्त आहेत, असा दावा राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे. १५ प्रमुख विभागांमध्ये ३० टक्क्यांपेक्षा जास्त पदे का रिक्त आहेत याचे उत्तर केंद्र सरकारकडे आहे का? गॅरंटीचे खोटे दावे करणा-या पंतप्रधानांच्याच कार्यालयात मोठ्या प्रमाणात अत्यंत महत्त्वाची पदे का रिक्त आहेत? कायमस्वरूपी नोक-या देणे हे ओझे **(पान ७ वर)**

## बँक कर्मचाऱ्यांना ५ दिवस काम आणि पगार वाढ

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकार आचारसंहिता लागू होण्यापूर्वी बँक कर्मचा-यांना मोठी भेट देऊ शकते. सरकार बँक कर्मचा-यांसाठी आठवड्यातून ५ दिवस काम करण्याच्या योजनेला मंजूरी देण्याचा विचार करत आहे.

फायनान्शियल एक्स्प्रेसच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बँक युनियन्समध्ये झालेल्या करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँक कर्मचा-यांनाही पगारात १७ टक्के वाढ मिळू शकते.

बँक संघटनांनी सरकारी कार्यालये, आरबीआय कार्यालये आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाप्रमाणे १८० दिवसांत आठवड्यातून ५ कामाचे दिवस लागू करण्याचे आवाहन केले होते. अहवालानुसार, एका अधिका-याने सांगितले की सरकार या प्रस्तावाच्या बाजूने आहे परंतु आठवड्यातील ५ दिवस काम जाहीर करण्यासाठी योग्य वेळेची वाट पाहत होते आणि कदाचित ती वेळ आता आली आहे.

सध्या देशातील पेमेंट बँक आणि लघु वित्त बँकांसह सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँकांमध्ये १५.४ लाख कर्मचारी काम करतात. त्याच वेळी, प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये सुमारे ९५,००० कर्मचारी काम करतात.

**दररोज ४० मिनिटे अतिरिक्त काम**

इंडियन बँक्स असोसिएशन या बँक युनियनच्या बैठकीत सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत रोख व्यवहारांसह बँक कर्मचाऱ्यांचे एकूण कामकाजाचे तास दररोज ४० मिनिटांनी वाढवता येतील असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. ४० मिनिटांच्या वाढीव वेळेत, नॉन-कॅश व्यवहार केले जातील.

**(पान ७ वर)**

## दिल्लीत महिलांसाठी मुख्यमंत्री महिला सन्मान योजना

नवी दिल्ली : मध्य प्रदेशमध्ये तत्कालीन शिवराजसिंह चौहान यांच्या सरकारने मुख्यमंत्री लाडली बहन योजना सुरू केली. त्या माध्यमातून महिलांना दरमहा १००० रुपये देण्यात येत आहेत. आता, दिल्ली सरकारनेही बजेटमध्ये मुख्यमंत्री महिला सन्मान योजना सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. दिल्लीच्या अर्थमंत्री आतिशी यांनी सोमवारी विधानसभेत त्यांच्या कारकिर्दीतला १० वा अर्थसंकल्प सादर केला. राजधानी दिल्लीसाठी त्यांनी ७६,००० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. दिल्लीची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येपेक्षा १.५५ टक्के एवढी असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.



देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत दिल्लीची लोकसंख्या १.५५ टक्के असली, तर देशाच्या जीडीपीमध्ये दिल्लीचं योगदान दुप्पटपेक्षा जास्त असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले. सन २०२३-२४ देशाच्या सरासरी जीडीपीमध्ये दिल्लीचे योगदान ३.८९ टक्के होत असल्याचंही त्यांनी सांगितले. तसेच, दिल्लीतील महिलांसाठी मुख्यमंत्री महिला सन्मान योजना सुरू करण्यात येत असल्याची घोषणाही त्यांनी केली.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे बजेट सादर करताना आतिशी यांनी म्हटले की, २०१३ साली आम्ही राजकारणात आलो. त्यावेळी, लोकांचा लोकशाहीवरील विश्वास संपुष्टात आला होता. तेव्हा नेते येते होते, जात होते. सरकार येत होते, जात होते. पण, लोकांच्या आयुष्यात कुठलाही सुधार होत नव्हता. गृहिणींचे पैस महिन्याच्या २५ तारखेलाचा संपत होते. अनेकांना दैनिक गरजा भागवण्यासाठीही सोने-दागिने गहाण ठेवावे लागत. त्यामुळेच, सर्वसामान्य **(पान ७ वर)**

## योगी आदित्यनाथ यांना बॉम्बने उडवण्याची धमकी

लखनऊ : काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा व्हिडीओ व्हायरल झाला होता. मात्र, यातील मुख्य आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली. त्यानंतर आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बॉम्बने उडवण्याची धमकी दिल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊच्या पोलीस नियंत्रण कक्षात आलेल्या या धमकीच्या कॉलने खळबळ उडवून दिली आहे.



लखनऊच्या पोलीस नियंत्रण कक्षाच्या सीयूजी क्रमांकावर एक कॉल आला. हा कॉल हेड कॉन्स्टेबल उधम सिंग यांनी घेतला. या कॉलमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. कॉन्स्टेबलने 'तुम्ही कुठून बोलत आहात?' असं विचारलं असता कॉलरने लगेचच कॉल डिस्कनेक्ट केला.

या प्रकरणी मध्य विभागातील महानगर कोतवाली येथील सुरक्षा मुख्यालयात तैनात हेड कॉन्स्टेबल उधम सिंग यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पोलीसांकडून तपास सुरू

**(पान ७ वर)**

## पाकच्या धर्मगुरूंना ब्रिटनमध्ये प्रवेशबंदी

लंडन : ब्रिटनमधील वाढत्या कट्टरवादावर आता पंतप्रधान ऋषी सुनक यांनी आता यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक योजना तयार केली असून या अंतर्गत अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि इंडोनेशियातील कट्टरपंथी इस्लामिक धार्मिक नेते ब्रिटनमध्ये येऊ शकणार नाहीत.

यासाठी व्हिसा वॉर्निंग लिस्ट तयार करण्यात येत आहे. नव्या योजनेनुसार या यादीत समाविष्ट असलेल्या सर्व नावांना ब्रिटनमध्ये प्रवेश मिळणार नाही. यासाठी स्वयंचलित प्रवेश बंदीचा प्रोग्रॅम तयार करण्यात आला आहे. इस्त्रायल-हमास युद्ध सुरू झाल्यापासून ब्रिटनमध्ये पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ अनेक निदर्शने झाली. पोलिस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. ब्रिटिश खासदारांना खुलेआम धमक्या देण्यात आल्या. ब्रिटीश सरकारकडून तयार करण्यात येत असलेल्या नवीन योजनांनुसार, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि इंडोनेशियासारख्या देशांतील **(पान ७ वर)**

## स्टॅलिन यांना सुप्रीम कोर्टने फटकारले

नवी दिल्ली : तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचे पुत्र आणि तामिळनाडूचे मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन हिंदू धर्माबाबत अतिशय खालच्या स्तराचे वक्तव्य केले होते. त्यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी केली होती. त्यांच्या या वक्तव्याबद्दल आता सुप्रीम कोर्टाने उदयनिधी यांना कडक शब्दांत फटकारले. स्टॅलिन यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर केला असे कोर्टाने म्हटले.

सनातन धर्माबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी उदयनिधी स्टॅलिन यांच्याविरोधात अनेक राज्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. ही सर्व प्रकरणे एकत्र करण्याची मागणी



करत उदयनिधी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आपल्याला न्यायालयाकडून दिलासा मिळेल असे त्यांना वाटले, पण उलट न्यायालयाने त्यांनाच कडक शब्दात फटकारले.

विविध राज्यात गुन्हे दाखल सोमवारी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती सचिन दत्ता यांच्या खंडपीठासमोर सनातन उदयनिधी यांच्या याचिकेवर सुनावणी झाली. वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात स्टॅलिन यांची बाजू मांडताना म्हटले की, बंगळुरू, उत्तर प्रदेश, बिहार आणि जम्मूमध्ये खटले दाखल झाले आहेत, ते एकत्र विलीन केले पाहिजेत. **(पान ७ वर)**




**लातूर येथे नूतन काशी जगतगुरु पूज्य श्री. मल्लीकार्जून महास्वामीजी यांनी श्री. मन्मथप्पा पंचाक्षरी यांना आर्शिर्वाद दिला. व सत्कार केला. यावेळी बाजूस लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे मॅडम.**

## मनपाचे शिलकी अंदाजपत्रक सादर

### विविध मूलभूत गरजांसाठी मोठी तरतूद



लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारित आणि २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रक मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सोमवार दिनांक ४ मार्च रोजी जाहीर केले.आयुक्तांनी सादर केलेल्या या शिलकी अंदाजपत्रकात विद्युत विभाग,बांधकाम विभाग, आरोग्य विभाग तसेच पाणीपुरवठा विभागासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे.

आयुक्त मनोहरे यांनी सादर केलेल्या या अंदाजपत्रकात पालिकेला यावर्षी ८३९ कोटी ८३ लक्ष रुपये उत्पन्न अपेक्षित असून या वर्षात ८३९ कोटी ५८ लक्ष रुपये खर्च होणार आहे.

यावर्षी मनपाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात विद्युत विभागातील साहित्य खरेदी व देखभाल दुरुस्तीसाठी ४० लाख रुपये तसेच पथदिवे व वीज बिलासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.शहरात एलईडी दिवे बसवण्यासाठी ५० लाख तर ट्रॅफिक सिग्नल देखभाल व दुरुस्तीसाठी १५ लाख रुपयांची तरतूद मनपाने केली आहे. रुग्णालय व दवाखान्यांसाठी ३१ लाख खर्च अपेक्षित आहे. मोकाट जनावरांच्या बंदोबस्तासाठी कोंडवाड्यावर ६६ लाख ५० हजार रुपये खर्च केला जाणार आहे तर सार्वजनिक उद्यानासाठी एक कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बांधकाम विभागात रस्ते व गटार दुरुस्तीसाठी दोन कोटी, शैक्षणिक विषयासाठी दोन कोटी ७४ लाख ८० हजार रुपये तर ग्रंथालयांसाठी दोन कोटी २४ लाख २० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अपंग कल्याण निधी महिला व बालकल्याण तसेच मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी अंदाजपत्रकाच्या पाच टक्के म्हणजे प्रत्येकी ६६ लाख ७३ हजार ४४३ रुपये तरतूद केली गेली आहे.नवीन रस्त्यांसाठी दोन कोटी रुपये, नवीन गटारांची कामे व दुरुस्तीसाठी दोन कोटी तसेच मान्यवरांचे पुतळे व कमानी उभारणे तसेच त्याची निगा राखण्यासाठी २५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.पंपिंग केंद्रावरील साहित्य खरेदीसाठी १५ लाख रुपये,नवीन पाईपलाईनसाठी ५० लाख **(पान ७ वर)**




## विकास कामासाठी १० कोटीचा निधी मंजूर रेणापूरकरांनी आ. कराड यांचे मानले आभार

लातूर /प्रतिनिधी- रेणापूर शहरातील प्रभू श्रीराम मंदिर परिसर विकास, स्वामी समर्थ महाराज मंदिर सभामंडपासह विविध विकास कामासाठी तब्बल १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून रेणापूर शहरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांच्यासह नागरिकांनी जाहीर आभार व्यक्त केले. याप्रसंगी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

रेणापूर नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर शहराकडे विशेष लक्ष देऊन आजपर्यंत वेगवेगळ्या योजनेतून कोट्यावधी रुपयाचा निधी रेणापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच मंजूर करून दिला आहे. रेणापूर येथील प्रभू श्रीराम मंदिर परिसर विकासासाठी २ कोटी आणि शहरातील अंगणवाडीं सुधारणा करण्यासाठी तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी उपलब्ध करून दिला त्याचबरोबर रेणापूर नगर पंचायत अंतर्गत पोलीस स्टेशन ते मेन रोड पर्यंत नाला बांधकाम करणे १ कोटी ३० लक्ष, प्रभाग क्र. १ मध्ये नगरपंचायत ते रुपेश अकनगिरे यांच्या घरापर्यंत सी. सी. रोड व नाली करणे ८० लक्ष, प्रभाग क्र. ६ मध्ये बालाजी मंदिर परिसरात सी. सी. रोड व नाली बांधकाम करणे ५० लक्ष, रेणापूर नगरपंचायत अंतर्गत ओमनगर येथे स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे **(पान ७ वर)**

## इस्रो प्रमुख एस सोमनाथ यांना कर्करोग

बंगळूरू : भारताची पहिली सौर मोहीम आदित्य एल-१ च्या प्रक्षेपणावेळी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख



एस. सोमनाथ कर्करोगाशी झुंजत होते, अशी धक्कादायक माहिची समोर आली आहे. एका मुलाखतीमध्ये स्वत: एस. सोमनाथ यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे. चंद्रयान-३ मोहिमेच्या लाँचिंगदरम्यान त्यांना काही आरोग्यविषयक समस्या जाणवल्या होत्या. मात्र त्यावेळी काही स्पष्टपणे समजत नव्हते. मला आदित्य एल-१ मोहिमेच्या प्रक्षेपणादिवशीच या आजाराबाबत समजले. त्यामुळे मी आणि माझे कुटुंबीय चिंतेत पडलो होतो, असे सोमनाथ यांनी सांगितले.

सोमनाथ यांच्या आजारपणाबाबत कळल्यावर सहकारी शास्त्रज्ञांनाही धक्का बसला होता. मात्र त्यांनी या आव्हानात्मक वातावरणात स्वत:ला सावरले. कुटुंब आणि सहकारी शास्त्रज्ञांनाही आधार दिला. तसेच आदित्य एल-१ च्या प्रक्षेपणानंतर त्यांच्या पोटाचे स्कॉन करण्यात आले. त्यानंतर या गंभीर आजाराचा उलगडा झाला. मात्र नंतर अधिक तपासासाठी ते चेन्नईमध्ये गेले. त्यामधून सोमनाथ यांना हा आजार अनुवांशिकरीत्या मिळाल्याचे समोर आले. काही दिवसांमध्ये सोमनाथ यांना कर्करोग असल्याचे निदान झाले. त्यानंतर सोमनाथ यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या सोमनाथ यांना केमोथेरेपी दिली जात आहे. **(पान ७ वर)**

दैनिक
# यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
मंगळवार दि.०५ मार्च २०२४

E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

## भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या मराठवाडा अध्यक्ष पदी ज्ञानोबा चाटे यांची निवड



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानोबा चाटे यांचे सामाजिक क्षेत्रा-तील उल्लेखनीय कार्य पाहुन रविंद्र देविदी मुंबई प्रणित भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या मराठवाडा अध्यक्ष पदी नुकतीच कामिनी निवास पांडूरंगवाडी मिरा ठाणे येथील कार्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली असुन भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र देविदी यांच्या हस्ते चाटे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे

या निवडीबद्दल भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष मधुकर पतंगे, दक्षिण महाराष्ट्र अध्यक्ष बालासाहेब इतापे , महाराष्ट्र दक्षता अधिकारी संजय तिखे पाटील, सचिव तुळशीराम लुंगारे, महामंत्री प्रदिप फाले, महाराष्ट्र एरिया ऑफीसर प्रकाश रोकडे, महाराष्ट्र जनसंपर्क अधिकारी आनंद वरवटे, जिल्हाध्यक्ष बालाजी चावरे, तालुका अध्यक्ष श्वेत मोगरगे रेणापुर तालुका अध्यक्ष राहुल गुणाले, अहमदपूर तालुका पि.आर.ओ पद्माकर मोरे, सामाजिक कार्यकर्ते इतिराज केंद्रे, प्रा. गोविंद भगत, राहुल गुणाले, प्रकाश रोकडे, संजय बोबडे,संजय सातपुते, मन्मथ प्रयाग, शेख जहाँगीर , गोविंद बडे, गंगाधर हेंगणे, संदिप मुरकुटे, राजु पाटील, कैलास झुंनझुंनवार , गजानन पारसेवार, अमोल मोरे, नरसिंग चावरे, गजानन हाडोळे, आदींनी अभिनंदन केले आहे

## मंत्री संजय बनसोडे आणि मा.आ.बब्रुवान खंदाडे यांचा नागरी सत्कार संपन्न



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना.संजयभाऊ बनसोडे आणी माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे यांचा सम्राट मित्रमंडळ-लातूर अहमदपूर च्या वतीने येथील जिल्हा परिषद मैदान येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, तक्षशिला बुद्ध विहार काळेगाव,अहमदपूर येथील तथागत बुद्ध मूर्ती उद्धाटन सो-हळा आणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा सुशोभीकरणाच्या निमित्ताने महागायक आदर्श शिंदे यांच्या बुद्ध भीम गीतांचा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी पूज्य भंते महाविरो थेरो,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाक्के पाटील, इंजिनियर विश्वजीत गायकवाड, शिवानंद हेंगणे,बालाजी पाटील चाकूरकर, सांबअप्पा महाजन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व प्रथम तथागत गौतमबूध्द, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणी छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या प्रतिमांना सामूहिक अभिवादन करून त्रीशरण पंचशिल घेण्यात आले.सामूहिक स्वागत सत्कारा नंतर मंत्री ना. संजयभाऊ बनसोडे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्या बद्दल आणी माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणी केल्या बद्दल आणी सूशोभीकरणासाठी निधी मंजूर केल्या बद्दल शाल पुष्पहार आणी मानपत्र देऊन नागरी सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना ना.संजय बनसोडे म्हणाले की, समाजाच्या प्रत्येक सूख दूःखात मी सहभागी असून विकासाच्या प्रत्येक गोष्टीत समाजाचा घटक म्हणून खंबीर पणाने साथ देण्याचे अश्वासन दिले.

तर माजी आमदार बब्रुवान खंदाडे सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, राजकारणात उपेक्षीत दूर्लक्षीत व वंचीत घटकांना स्थान देण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला असून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारला ही एक मोठी उपलब्धी असून आता या स्मारकाचे सूशोभीकरणासाठी मला योगदान देता आले याचा मला आनंद आहे.आज समाजाच्या वतीने माझा जो नागरी सत्कार झाला त्या बद्दल मी कायम ऋणी आहे असं प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष युवानेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले तर आभार आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,अरूण वाघंबर, अँड. सूभाषराव सोनकांबळे,अजय भालेराव, भीमराव कांबळे, गणेश मुंडे,मिलींद कांबळे, शिवाजीराव भालेराव, आकाश सांगवीकर, प्रशांत जाभाडे, जीवन गायकवाड, डॉ.बालाजी थीट्टे, सचिन बानाटे, संतोष गायकवाड, मनोहर गायकवाड, बाबासाहेब वाघमारे, विलास चापोलीकर, धम्मानंद कांबळे, रमेश लेंडेगावकर, विश्वास कांबळे, अशोक लामतुरे, बाबुराव बोडके, मिलींद कांबळे, संभाजी कांबळे, प्रदिप कांबळे, दिलीप भालेराव, शरद बनसोडे, संजय माकेगावकर, शरद सोनकांबळे, सतीश जंगले आदींनी पुढाकार घेतला.

## अहमदपूर महावितरणच्या पॉवर ट्रान्सफार्मरला आग ; लाखो रुपयांचे नुकसान



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) अहमदपूर महावितरणच्या पॉवर ट्रान्सफार्मरला आग ; लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील महावितरण उपविभागातील शहरासह ग्रामीण भागास विद्युत पुरवठा करणारा एक पॉवर ट्रान्सफार्मरला दि ३ मार्च रोजी दुपारी ३ : ३० वाजण्याच्या सुमारास भिषण आग लागुन जळुन खाक होऊन लाखोचे नुकसान झाल्याची घटना घडली असुन शहरासह ग्रामीण भागाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे.

या संदर्भात संबंधीत विभागातील अधिकारी तसेच कर्मचारी यांच्याकडे विचारपुस केला असता आगीचे नेमके कारण अद्याप समजले नाही . एक तर रविवार हा सुट्टीचा दिवस असल्यामुळे मोजकेच अधिकारी, कर्मचारी आपल्या कर्तव्यावर होते यापैकीच एका अधिकाऱ्याने नगरपालिका अग्नीशमन दलास पाचारण करून बोलावुन घेतल्याने अग्नीशमन दलातील कर्मचारी सोनकांबळे कैलास, लाळे अजित , जाधव प्रकाश, गायकवाड प्रशांत यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली परंतु सदरील जळुन खाक झालेला पॉवर ट्रान्सफार्मर दुरूस्त होण्यासाठी अयोग्य असल्याने नविन ट्रान्सफार्मर बसवण्यात किती वेळ लागेल याची चिंता शहर वासीयांना भेडसावत आहे .

या आगीमुळे ट्रान्सफार्मरमधील ऑईलचे फवारे उडून महावितरण कार्यालयाच्या परिसरातील गवतासही आग लागल्यामुळे थोडा वेळ परिसरात भितीचे वातावरण पसरले होते आग इतकी भिषण होती की शहरात सर्वत्र काळ्या काळ्या धुराचे लोट पसरल्याने शहरातील नागरीकांनी आग बघण्यासाठी महावितरण परिसरात एकच गर्दी केली होती

या संदर्भात महावितरणचे उप- कार्यकारी अभियंता दिनकर पिसे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगीतले की, पॉवर ट्रान्सफार्मरला आग कश्यामुळे लागली आहे हे तपासणी पथकाने तपासणी केल्यानंतरच स्पष्ट कारण समजेल लवकरच काही भाग वगळता खंडीत केलेला विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात येईल अशी प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधिशी बोलताना दिली.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम संपन्न



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आज पाच वर्षाखालील अहमदपूर येथील बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी ही यंदाच्या पल्स पोलिओ मोहिमेची टॅगलाईन आहे.

या विषयीची सविस्तर माहीती अशी की, आज पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेत नालंदा इंग्लिश स्कूल टेंभुर्णी रोड, अहमदपूर येथे राबविण्यात आली. यावेळी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम बूथ प्रमुख नावसाबणे सतीश यांच्यासह निराधार कमीटीचे सदस्य फिरोजभाई शेख, मद्देवाड नंदकुमार, सदस्य तेलंगे पूजा, नागरगोजे अपेक्षा, वाघमारे अंजली, ताडमे नंदिनी आदींचा सहभाग होता.

## लीनेस क्लब ऑफ अहमदपूरच्या वतिने अन्नधान्य वाटप व मार्गदर्शन



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) लीनेस क्लब ऑफ अहमदपूर चा आगळावेगळा उपक्रम झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या कुटुंबाला अन्नधान्य वाटप करुन आरोग्य विषयक मार्गदर्शन केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, लीनेस क्लब ऑफ अहमदपूर चा आगळा-वेगळा उपक्रम झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या कुटुंबाला अन्नधान्य वाटप करून तिथे राहणाऱ्या महिलांसाठी आरोग्यावर मार्गदर्शन विशेषतः चाळीस वर्षानंतर हाडे ठिसूळ होण्याची कारणे यावर डॉक्टर आदिती पलमटे यांनी मार्गदर्शन केले. लिनेस क्लबच्या अध्यक्ष्या सुनंदा कुलकर्णी यांनी डॉक्टर अदितीचे स्वागत केले तसेच नुतन सदस्या महाजन ताई, सविता मोघेकर कोंडापुरे ताई यांचे स्वागत केले सर्व महिलांचे आभार उषा सोडे मॅडम यांनी मानले आणि संचालन वनिता पाटील मॅडम यांनी केले.

यावेळी राणी महाजन, शिला घाटोळ , योग शिक्षिका सौ. कलावती भातांब्रे , कौशल्या पवार, उषा सुडे ,सविता मोघेकर महाजन ताई कोंडापुरे ताई आदिंची उपस्थित होती.

## भारताचा विद्यार्थी हा जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकला पाहिजे यासाठी शिक्षकांनी अपडेट राहणे गरजेचे - डॉ. दिलीप मुगळे

### तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्याच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रतिपादन



अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) नविन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने भारताचा विद्यार्थी हा जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकला पाहिजे यासाठी प्रथमतः शिक्षकांनी अपडेट राहिले पाहिजे यासाठीच हे प्रशिक्षण असल्याचे प्रतिपादन तालुकास्तरिय शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्याच्या उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणुन बोलत होते.

ते राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड आणि गटसाधन केंद्र अहमदपूर यांच्यावतीने घेण्यात येत असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक वृद्धी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात दिनांक ४ मार्च वार सोमवार रोजी डॉ. एस. एस. एम. प्रतिष्ठान अंबाजोगाई रोड अहमदपूर येथे करण्यात आली. यावेळी ते उद्घाटक म्हणुन बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य सुलभक तथा प्रशिक्षण समन्वयक श्रीमती कामाक्षी पवार होत्या. टेकाळे आर. एस., उंदिरकल्ले सर, जगताप वाय. एस., श्रीमती पांचाळ एस.बी., तपघाले जे.एस., खुडे ए.व्ही., सोमवंशी एस. के., केंद्रे एस.बी., गाटचेरले पी.व्ही., डॉ. बालाजी कारामुंगीकर, गुंडरे एस.पी., गडवे एन.टी., वाघमारे बी.आर., गिरी जी.डी., श्रीमती बुर्गे एस.आर., इत्यादी सुलभक व गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी राम चामे, सोमनाथ केंद्रे, मनिषा गुणाले, रत्नप्रभा मंडलवार आदिंची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. मुगळे म्हणाले की, राष्ट्राच्या उभारणीत शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षक हे ज्ञानाने समृद्ध असणे काळाची गरज आहे. काळानुसार शिक्षकांना स्वतःमध्ये बदल करून घ्यावा लागेल.नविन शैक्षणिक धोरणानुसार प्रशिक्षक घेवून अध्ययन निष्पत्तिसाठी प्रयत्नशिल राहणे गरजेचे असल्याचेही ते शेवटी म्हणाले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कामाक्षी पवार म्हणाल्या की, २१ व्या शतकातील कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी शिक्षकांनी वेगवेगळया कौशल्याचा विकास या प्रशिक्षणाच्या माध्यमातुन करने गरजेचे आहे. शिक्षक जर विविध कौशल्याने परिपूर्ण असतील तर विद्यार्थीही शिक्षकांचे अनुकरण करुन आपला प्रगतीचा मार्ग अंगिकारतील. दि. ४ मार्च ते ५ मार्च रम्यान चालणारे हे प्रशिक्षण वेळेत, शिस्तबद्ध आणि व्यवस्थित झाले पाहिजे असेही त्या शेवटी म्हणाल्या.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुलभक डॉ बालाजी कारामुंगीकर यांनी केले. सूत्रसंचलन सुलभक बाबासाहेब वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुलभक टेकाळे यांनी मानले. या प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात जवळपास १५० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

सदरील प्रशिक्षणसाठी गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य समन्वयक, सुलभक, गटसाधन केंद्र अहमदपूर येथील कर्मचारी कार्य करत आहेत.

## हाडोळती परिसरात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण संपन्न



हाडोळती दि.०२(नागसेन गायकवाड) राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आज पाच वर्षाखालील प्राथमिक आरोग्य केंद्र हाडोळती परिसर व अंतर्गत परिसरातील बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी ही यंदाच्या पल्स पोलिओ मोहिमेची टॅगलाईन आहे. त्या अनुषंगाने लसीकरण मोहिम राबविण्यात आली.

प्राथमिक आरोग्य केंद्र हाडोळती अंतर्गत आरोग्य वर्धीनी केंद्र वळसंगी येथे, सरपंच नंदकुमार बोडके यांचे हस्ते लाभार्थी ना पोलिओ लसीचे डोस पाजून औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नंदकुमार बोडके यांनी गावातील सर्व लाभार्थ्यांना लस देण्याचे नागरिकांना आवाहन केले.



सदरील लसीकरण मोहिमेत डॉ. अंजली कोतलापुरे, श्रीमती प्रेमिला म्हेत्रे, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती उपस्थित होते.

तसेच बसस्टँड जवळील अंगणवाडी ही पोलिओ डोस लसीकरण राबविण्यात आले. या वेळी सरपंच नंदकुमार बोडके, उपसरपंच बाळासाहेब येरमे, डॉ. अंजली कोतलापुरे, आशा वर्कर शोभा येरमे उपस्थीत होते.

## प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मोरूचं लगीन कथेने पोट धरून हसवले




अहमदपूर दि.०४(कारामुंगीकर) महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागात रोटी - बेटी व्यवहार मोठ्या प्रमाणात होतात, असे असले तरी सीमावर्ती भागातील कानडी भाषा आणि मराठी भाषेतून उद्भवलेल्या लग्नातील प्रसंगातून प्राचार्य डॉ .वसंत बिरादार पाटील यांच्या ममोरूचं लगीन म या विनोदी कथेने विद्यार्थ्यांना पोट धरून हसवले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमात ममोरूचं लगीनफ या कथेचे मकथनफ महाराष्ट्रातील मराठीचे प्रसिद्ध कथाकार, ललित साहित्याचे सिद्धहस्त लेखक , ज्येष्ठ समीक्षक तथा प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले .

यावेळी विचार मंचावर उपप्राचार्य डॉ .दुर्गादास चौधरी, कार्यक्रमाचे संयोजक प्रो. डॉ . अनिल मुंढे , डॉ. मारोती कसाब , डॉ . डी . एन . माने , अजय मुरमुरे प्रा . कल्पना कदम व निमंत्रित कवि आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी आपल्या म मोरूचं लगीन म या विनोदी कथेचे आपल्या,रसाळ , खुमासदार व बहारदार शैलीत केले. या कथेच्या माध्यमातून ममोरूफ आणि मबिरूफ च्या बालपणापासून ते मोरूच्या लग्नापर्यंतचा प्रवास अत्यंत सुंदर पद्धतीने हास्याचे कारंजे फुलवत विनोदी शैलीतून कथा सादर केली.

मोरूचं शालेय जीवन , महाविद्यालयीन जीवन तसेच, त्याची पारिवारिक स्थिती आणि लग्नाबद्दलची उत्कंठता आणि लग्नाच्या वेळीचे विविध प्रसंग, ग्रामीण भाषेतून सादर केले.


यातील एक प्रसंग मराठी भाषा गौरव दिनाचा खरा गौरव करणारा होता.लग्नाला निघण्या पासून,लग्नघरी जाणे, मंदिरात नवरदेव बसणे,रूसवे फुगवे, लग्नातील गाणे,देव बाप्पा, निवेदकांचा गोंधळ, लग्नानंतरच्या पंक्तीचे अत्यंत रसाळ व खुमासदार शैलीत निवेदन येते. लग्नानंतर रूखवताचा मोठा रंजक व गंभीर प्रसंग विनोदाच्या अंगाने या कथेत डोकावतो.

प्रत्येक भाषिकाला आपल्या भाषेवर प्रेम, अभिमान असतो. कर्नाटक मधील कानडी भाषेचा अभिमान तेथील स्त्री पात्राला उखाणा घेताना किती आहे ? हे दिसून आले . तर महाराष्ट्रातून गेलेल्या मवरफ पक्षाच्या वऱ्हाडी स्त्रीला वाटते की , कानडी समजत नसल्याने तिने मराठीतून मउखाणाफ घ्यावा. मउखाणाफ घेण्यावरून दोघीं तिघीं मध्ये वादावादी होते. शेवटी आपल्याला मराठी बद्दल जो अभिमान आहे तसाच अभिमान कानडी भाषेतील भाषिकांना पण असू शकतो . शेवटी हा वाद विकोपाला जातो.अशा विविध प्रसंगाचे शब्दाच्या माध्यमातून बिड़बनात्मक चित्रण कथाकार प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांनी सुंदर ध नेटक्या पद्धतीने करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक प्रो. डॉ . अनिल मुंढे यांनी केले तर ; सूत्रसंचालन डॉ . बब्रुवान मोरे यांनी व आभार डॉ . मारोती कसाब यांनी मानले . यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कबीरवाणी

**कांचन री पारस परसि**
**बहुरी न लोहा होय।**
**चन्दन बास पलास विधि,**
**ढाक कहै नहि कोय ।**



**भावार्थ** : ज्याप्रमाणे परिसाचा लोखंडाला स्पर्श होवून त्याचे सोने झाल्यानंतर पुन्हा त्याचे लोखंड होत नाही. अगदी तसेच मलयगिरीच्या सुगंधाने पळस वृक्ष चंदनाचा झाल्यावर त्याला परत कोणी पळस म्हणत नाहीत. म्हणजेच संत कबीर सांगतात - सत्संगाच्या प्रभावाने शुद्ध झाल्यावर कोहीही नंतर नकृष्ठ राहतात नाही. त्याचे पुर्वीचे रुप परत येत नाही.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
**मो . ९८२३११२९०७**

यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. ०५ मार्च २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## राम लल्लाच्या दर्शनासाठी आस्था रेल्वे आज धावणार

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – अयोध्येतील प्रभू रामचंद्राच्या राम लल्लाचे दर्शन घेण्यासाठी धाराशिव लोकसभा मतदार संघातील १३४४ रामभक्त दि.५ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता धाराशिव येथून आस्था रेल्वेने अयोध्येला जाणार आहेत. ५६० वर्षाच्या लढ्यानंतर प्रभू रामचंद्राचं मंदिर सर्वसामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी खुले झाले आहे. हा अत्यंत आनंदाचा क्षण धाराशिव लोकसभेसाठी आहे. या सर्व राम भक्तांना विशेष रेल्वेने जाणाऱ्यांना राम भक्तांचे स्वागत करण्यासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. अभिमन्यू पवार, आ. राजेंद्र राऊत, माजी आमदार सुजितसिंग ठाकूर, माजी मंत्री बसवराज पाटील, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे यांनी केले आहे.

# लोकशाहीला झोपवित असलेल्या मोदींना झोपवा

## ॲड.सरोदे व डॉ चौधरी यांचा हल्लाबोल






धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – ज्यांचे शिक्षण कुठे व किती झाले? त्याचे सर्टिफिकेट कुठे आहे ? हे माहित नाही ते लीडर म्हणून घेत आहेत. ते आदरणीय आणि कंपनीचे लीडर आहेत. आज सगळीकडे लीडरची कमतरता भासत असून उद्योजकांचे मोठे लीडर म्हणून मोदी काम करीत असल्यामुळे लोकशाही वाचविण्यासाठी समविचारी पक्षाच्या नेत्यांनी एकत्र आले पाहिजे. विशेष म्हणजे लोकशाहीला झोपवित असलेल्या मोदींना झोपवा असे थेट आवाहन करीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यावर ॲड असीम सरोदे व डॉ विश्वंभर चौधरी यांनी हल्लाबोल करीत दि.३ मार्च रोजी धो-धो धुतले.

छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या मैदानावर द्वेषमुक्त समाज आणि माणुसकीसाठी निर्भय बनो.... दडपशाहीच्या विरोधात, लोकशाही रक्षणासाठी.... निर्भय बनो कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी

डॉ विश्वंभर चौधरी, उत्पल चंदावर, बाळकृष्ण निढाळकर, ॲड श्रेया आवले आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड सरोदे म्हणाले की, मोदी यांनी गेल्या १० वर्षात एकही नवीन योजना जनतेच्या हितासाठी आणली नाही. मात्र धर्माबद्दल व मंदिर – मस्जिद याबद्दल दररोज बोलले जाते. हिंदू – मुस्लिम असा वाद निर्माण करून समाजासमाजामध्ये द्वेष पसरविण्याचे काम केले असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. त्यांनी लोकशाहीची मोडतोड सुरू केली असून हे रोखण्यासाठी राजकीय पुनर्वसन झाले पाहिजे असे ॲड सरोदे यांनी सांगितले. तसेच फोडा आणि राज्य करा याचा नितीचा अवलंब करून दुसऱ्याचा पक्ष बेईमानीने हिसकावून घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला कीड लावली असून ते गद्दार लोकांना साथ देत तर आहेतच. मात्र फडणवीस हे केवळ चिंचाळणारे नेते आहेत असा आरोप करीत ते गद्दारांना डोक्यावर घेत असल्याचा आरोप ही त्यांनी केला. मोदी यांनी यवतमाळ येथील सभेवर ५० कोटी रुपयांचा खर्च करून तेथील जनतेला काय दिले ? असा प्रश्न करीत छत्रपती शिवाजी महाराज असते तर मोदींचा कडेलोट केला असता असे त्यांनी सांगितले. यावेळी ॲड सरोदे यांच्यासह सर्वांचा तुळजाभवानीने परिधान केलेले महावस्त्र व तुळजाभवानी मातेच्या पायांचे कुंकू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास महिला, पुरुष व तरुण – तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुवाहाटीच्या हॉटेलमध्ये त्या दोन आमदारांना कोणी मारहाण केली ? व एअर होस्टेसचा लिफ्टमध्ये कोणत्या नेत्याने विनयभंग केला ? असा सवाल उपस्थित केला. याचा मागवा घेतला तर शिंदे सरकारमधील मंत्र्याच्या खुर्च्या हल्ल्याशिवाय राहणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला. माजी राज्यपाल भगतसिंग कोशारी यांनी अत्यंत उद्धट राजकारण केले असा आरोप केला. तसेच २०२४ ची निवडणूक मोदी विरुद्ध बेरोजगारी, महागाई अशीच असून कोणत्याही परिस्थितीत मोदी यांना हरवावेच लागेल असे आवाहन ॲड. सरोदे यांनी केले.

## लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी मोदी, शहाला हरविणे आवश्यक

### महाराष्ट्र संतांच्या भूमी असताना उत्तर प्रदेशच्या बुवाला कशासाठी बोलावता ? - डॉ चौधरी

लोकशाही आणि संविधान वाचवायचे असेल तर मोदी आणि शहाला हरवायचे आहे असे आवाहन करीत तुमचा राम आणि आमचा राम यामध्ये फार मोठा फरक आहे आमच्या देवात आणि धर्मात दलालांची गरज नाही असे सुनावत महाराष्ट्र ही संतांची भूमी असताना उत्तर प्रदेशातील बुवाला तुम्ही का बोलावता असा थेट प्रश्न डॉ विश्वंभर चौधरी यांनी मोदी व भाजपच्या मंडळींना विचारला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले नसते तर कोणी शिकले नसते. मात्र सध्या महिलांसाठी सगळ्यात वाईट कालखंड असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आरक्षण समितेसाठी आहे. मात्र आरक्षणावरुन देश अराजकतेकडे नेण्याचा सगळा प्रकार चालू असून राष्ट्रपित्याला गोळी घातली, राष्ट्रगीताला बंदी घातली, वंदे मातरमला व राष्ट्रध्वजाला भाजपने विरोध केला. असे असताना दुसरीकडे राष्ट्रप्रेम शिकविण्याचे नकली ढोंग करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. मोदी यांच्या नेतृत्वाखाली ७ देशांची परिषद झाली त्याचा गौवा मोठ्या प्रमाणात केला. मात्र तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी १०० देशांची शिखर परिषद घेतली. पण त्यांनी त्याचा गवगवा केला नसल्याचा टोलाही त्यांनी लगावला. विशेष म्हणजे उद्योजकांना २५ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. मात्र शेतकऱ्यांना १ रुपयांची देखील कर्जमाफी दिली नसल्यामुळे देशाचे आदानीकरण करून टाकले असल्याचा आरोप त्यांनी केला. तर शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्षाला १२ हजार रुपये टाकतात आणि त्यांचे ३० हजार रुपये खातात असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे गेल्या दहा वर्षात मोदी यांनी एकही जनतेच्या हिताची योजना आणली नाही मात्र मनमोहन सिंग यांच्या काळात राष्ट्रीय अन्नसुरक्षा, भूमी अधिग्रहण केलेल्या शेतकऱ्यांना चारपट रक्कम, मनरेगा, वनाधिकार, शिक्षणासाठी आरटीआय अशा अनेक योजना आणल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

## भ्रष्ट्राचारी नेत्यांची चौंकशी करायची सोडून माझी चौंकशी लावली - पाटील




परंडा दि.४ (प्रतिनिधी) – मराठा समाजाला आरक्षण मिळऊन दिल्याशिवाय एक इंच देखील मागे हटणार नाही. भ्रष्ट्राचारी नेत्यांची चौकशी करायची सोडून सरकारने माझी चौकशी लावली आहे.

तीन दिवसांपासून चौकशी समितीची वाट बघत आहे. पुन्हा समाजाने आक्षणासाठी सरकारशी लढण्यासाठी एकजूटीने सज्ज व्हावे, असे आवाहन मराठा योध्दा मनोज जरांगे यांनी दि.३ मार्च रोजी केले.

मनोज जरांगे यांचा संवाद दौरा सुरु झाला आहे. जरांगे यांचे सकल मराठा समाजाच्यावतीने पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. श्री विठ्ठलाची मुर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला. उद्योजक रामभाऊ पवार यांच्या सुर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलच्या आयसीयू विभागाचे जरांगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विविध संघटना तसेच मुस्लीम समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते म्हणाले की, भ्रष्ट्राचारी पुढाऱ्यांची चौकशी करायची सोडून माझी चौकशी लावली. मी चौकशीला घाबरणारा नाही असा इशारा दिला. तीन दिवसांपासून चौकशी समितीची वाट पाहिली व संवाद दौरा सुरू केला. १० टक्के आरक्षण आपल्या कामाचे नसून अर्धवट असून त्याचा लाभ राज्य मर्यादित असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच आपल्या लेकरांना उच्च शिक्षणात लाभदायक नाही. हे तुम्हा आम्हाला मान्य नसलेले आरक्षण सरकार लादण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट करीत मी मान्य केले नाही म्हणून माझ्यावर दबाव टाकीत असल्याचे सांगितले. म्हणूनच एसआयटी चौकशी लावली असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. मी घाबरनारा नसून जेलमध्ये जायला तयार आहे. पण पूर्ण ओबीसीतूनच आरक्षण घेणार असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी हजारो सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

## हास्यसम्राट गणेशपुरे, बुगडे व बद्रिके यांची तुफान कॉमेडी

### चला हवा येऊ द्या, भीमगीते, शिव चरित्रावर व्याख्यान, गझल मुशायरांचा घेतला आनंद

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्तवतीने आयोजित करण्यात आलेल्या महासंस्कृती महोत्सव २०२४ धाराशिव या कार्यक्रमांतर्गत श्री तुळजाभवानी क्रीडा संकूल येथे दि.३ मार्च रोजी दुपारी ४ वाजता शशिकांत माने व त्यांच्या संचाने भीम गीतांचे सादरीकरण केले. त्यानंतर प्रा.डॉ.सतिश चव्हाण यांनी शिव चरित्रावर व्याख्यान दिले. उपस्थित सर्व रसिक प्रेक्षकांना शिव चरित्राची प्रत्यक्षात जणू अनुभूती अनुभवयास मिळाली. त्यानंतर लगेच महाराष्ट्राची परंपरा असलेला मर्दानी खेळाचा अविष्कार संजिवनी इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित प्रेक्षकांसमोर उत्कृष्टपणे सादर केला.

आनंद समुद्रे व संघाने सादर केलेल्या शास्त्रीय गायनात धाराशिवकर मंत्रमुग्ध झाले. तसेच साहित्यिक युवराज नळे यांनी गझल मुशायराचा कार्यक्रम सादर केला.या गझल मुशायरा कार्यक्रमात सादर झालेल्या प्रत्येक शेर व गझल यास प्रेक्षकांनी तोंडभरून टाळ्यासह दाद दिली. यानंतर प्रेक्षक ज्या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत होते ते म्हणजे.... चला हवा येऊ द्या.... या हास्य विनोदी कार्यक्रमाची भारत गणेशपुरे, श्रेया बुगडे, कुशल बद्रिके व त्यांच्या सहकलावंतांनी उपस्थित प्रेक्षकांना आपल्या उत्कृष्ट



अभिनयच्या जोरावर हसण्यास भाग पाडले. क्रीडा संकुलावर एकच हास्यकल्लोळ पिकला, चला हवा येऊ द्या या कार्यक्रमातील शाळांतील विद्यार्थी तर सर्व प्रेक्षक लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरीक खदखदून हसत होते. राज्यातील विविध प्रांतातील संस्कृतीचे अदान-प्रदान, स्थानिक कलाकारासाठी व्यासपीठ लुप्त होत चाललेल्या कला व संस्कृतीचे जतन व संवर्धन तसेच स्वातंत्र्य लढयातील ज्ञात, अज्ञात लढवय्यांची माहिती आदी बाबी जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी महासंस्कृती महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाच्या आयोजित ठिकाणी महिला बचत गटांचे विविध प्रकारचे स्टॉल्सही लावण्यात आले आहेत. यामध्ये चविष्ट खाद्य पदार्थ, पूरण पोळी, दही धपाटे, पाणी पूरी, बिर्याणी, लस्सी, मठ्ठा ताक, ज्यूस, फराळ तसेच हस्तकला प्रदर्शन, पारंपरिक वेशभूषा दालन, पोलीस विभागामार्फत शस्त्र प्रदर्शन, शिवकालीन शस्त्र, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे दालन हे येणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधत आहेत. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, अप्पर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी शोभादेवी जाधव आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सा.बां. विभागाच्या कामगारांचे पेन्शनसह विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण



धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव अंतर्गत असलेल्या सार्वजनिक विभागातील कामगारांना पेन्शन व मयत कामगारांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर नोकरीत सामावून घेण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यास कार्यकारी अभियंता जाणून बुजून अक्षम्य दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे ते कामगार व त्यांचे वारस यांना न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते व पाटबंधारे कर्मचारी संघटनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रवेशद्वारासमोरच आमरण उपोषण दि.४ मार्चपासून सुरू केले आहे.

सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागातील मच्छिंद्र बाबुराव मुळे यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव नागपूर येथील महालेखापाल यांना मंजुरीसाठी पाठविलेला नाही. तर मुळे यांचे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मागील १० वर्षांची थकबाकी अडवून ठेवून रकमेचे व्याज दिलेले नाही ते देण्यात यावे. वाहन चालक काझी यांचे थकबाकी मंजूर करून व्याजासह रक्कम वाटप करण्यात यावी. तसेच मयत शिवाजी गरडे यांचा वारस मुलगा बालासाहेब यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कारवाई करावी त्यांची पत्नी महानंदाबाई यांना निवृत्तीवेतन रक्कम व्याजासह वाटप करावी व सेवा पुस्तके भरून पेन्शन मंजूरीचा प्रस्ताव महालेखापालाकडे पाठवावा. तर राधाबाई मारुती चौरे यांची पेन्शन गेल्या २० वर्षापासून मंजूर केलेली नाही ती मंजूर करण्यात यावी. बीड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे बाबू उमरे यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कुशल मजूर पदाची मागील थकबाकी देण्यात यावी. राम हिरवे व बळीराम मोटे या रोजंदारी कामगारांचा मागील पगार तात्काळ वाटप करण्यात यावा. तसेच मयत सदानंद कुलकर्णी यांच्या वारसास अनुकंप तत्वावर वर्ग चार पदावर सामावून घ्यावे. तर बाबू फड यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव महालेखापालाकडे सादर करून कपात केलेली रक्कम संबंधित परळी येथील आस्थापनाचे लिपिक व उप अभियंता यांच्याकडून वसूल करून घेण्यात यावी या सह इतर मागण्यासाठी वयोवृद्ध सेवानिवृत्त व विधवा महिलांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. यामध्ये मच्छिंद्र मुळे, काझी, महानंदाबाई गरडे, बालासाहेब गरडे, राधाबाई चौरे, बाबू उमरे, राम हिरवे, बळीराम मोटे, बाबु फड यांनी उपोषण सुरू केले असून त्यांना संघटनेचे राज्य सचिव डॉ राजेंद्र विहिरे व माजी जिल्हाध्यक्ष सतीश घोडेराव यांनी पाठिंबा दिला आहे.

## राष्ट्रवादीच्या डॉ. पाटील यांचा सरचिटणीसपदी नियुक्तीबद्दल सत्कार



कळंब दि.४ (प्रतिनिधी) – डॉ. प्रतापसिंह पाटील यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉँग्रेस युवक पक्षाचे कळंब तालुकाध्यक्ष प्रा.श्रीधर भवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे मराठवाडा अध्यक्ष प्रा.संजय कांबळे, उपसभापती गुणवंत पवार, शहराध्यक्ष मुसद्देक काझी, वक्ता प्रशिक्षण लिंबाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा.तुषार वाघमारे, विठ्ठल माने, मधूकर कोठावळे, किरण मस्के, भिमा हगारे, संतोष पवार, अतुल धुमाळ, विठ्ठल कोकाटे, चेतन वाघमारे, श्रीकांत मिटकरी, शंभु कोकिळ, अतिष वाघमारे, दत्ता काळे, रंजित कोल्हे, विश्वनाथ धुमाळ, स्वप्निल चिलवंत, सलमाभाभी सौदागर, शोभाताई मस्के, भाऊसाहेब कुचेकर, विलास बावणे, रावण वायसे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पक्ष वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार- डॉ. पाटील

कळंब तालुका राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसच्या वतीने व फादर बॉडीने सत्कार केला त्याबद्दल आभार मानत राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वाढीसाठी रात्रंदिवस प्रयत्न करणार असून कार्यकर्त्यांना ऊर्जा व सर्वतोपरी मदत करणार असे आश्वासन डॉ प्रतापसिंह पाटील दिले.

यशवंत
धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. ५ मार्च २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन, आनंद मेळावा साजरा

तुळजापुर दि.४ (प्रतिनिधी) – येथील मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये अध्यक्ष दिनेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विज्ञान दिन व आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्तांगण स्कूलच्या मुख्याध्यापिका विशाखा पाटील या होत्या. प्रारंभी तुळजाभवानी माता व डॉ. सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेतील विविध वर्गातील विद्यार्थ्यांकडून वैज्ञानिक प्रयोग करून त्यांचा अहवाल वाचन करण्यात आला.आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या फळ व खाऊची विक्री केली. याचा आनंद शाळेतील विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी लुटला. यावेळी संपूर्ण शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले होते. यासाठी शाळेतील सर्व शिक्षिका शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# पत्रकारांनी मन की बात नही जन की बात मांडावी- आमदार कैलास पाटील

## पत्रकारांच्या घरांसाठी निधी लोकप्रतिनिधी म्हणून कमी पडू देणार नाही







धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – पत्रकारांनी लोकांना दिलेली खोटी आश्वासने व खोट्या स्वप्नांच्या आश्वासनाच्या बातम्या करण्याऐवजी समाजाच्या उपयोगी पडतील अशा सकारात्मक बातम्या द्याव्यात. तसेच लोकांनी केलेल्या चांगल्या कामांच्या बातम्यांना चांगल्या पद्धतीने प्रसिद्ध देऊन त्याचा मेसेज सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम तर करावेच. विशेष म्हणजे मन की बात ऐवजी जन की बात आपल्या वृत्तपत्रातून निर्भीडपणे मांडावी असे आवाहन आमदार कैलास पाटील यांनी दि.३ मार्च रोजी केले.

व्हॉईस ऑफ मीडिया धाराशिव जिल्हा शाखेच्यावतीने जिल्ह्यातील पत्रकारांचा अपघात विमा व आयुष्यमान भारत योजना कार्डचा वितरण सोहळा धाराशिव शहरातील बीएसएनएल कार्यालयाच्या समोरील आर्यन फंक्शन हॉल येथे करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सिद्धिविनायक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ प्रतापसिंह पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, व्हाईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग मते, डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष वैभव पारवे, मराठवाडा उपाध्यक्ष अमर चोंदे आदी उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना आमदार कैलास पाटील म्हणाले की, पत्रकार जनतेचा आवाज होऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने आपल्या दैनिकांमध्ये प्रश्न मांडून प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून देतात. त्यामुळे त्या समस्या सोडविण्यासाठी आम्हाला देखील मदत होते. मात्र पत्रकारांच्या देखील काही समस्या असून यामध्ये त्यांचे स्वतःचे घर असणे आवश्यक आहे. त्यामुळे घरांसाठी आवश्यक असलेला निधी आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून कुठेही कमी पडणार नाही असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तसेच आजपर्यंत आपल्या जिल्ह्याची असलेली नकारात्मक ओळख पत्रकारांनी आपल्या लेखणीतून सकारात्मक बातम्या लिहून नव्याने जिल्ह्याची ओळख निर्माण करण्याचे काम करावे असे आवाहन केले. त्याबरोबरच एखाद्या लोकप्रतीनिधीने खोटी स्वप्न दाखवू नयेत असे सांगत केवळ वारंवार विकास होतोय अशी आश्वासने देण्याऐवजी विकास कामे पूर्ण केल्यानंतर त्या बातम्या पत्रकारांना आवर्जून द्याव्यात असा टोलाही त्यांनी कोणाचेही नाव न घेता लगावला. तर पत्रकारांनी केवळ आणि केवळ पॉझिटिव्ह म्हणजेच सकारात्मक पत्रकारिता करून जिल्ह्याची नव्याने ओळख करावी असे आवाहन त्यांनी केले. तसेच पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला ज्या ज्या गोष्टी करणे शक्य आहे त्यासाठी आम्ही निश्चित प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

तर दत्ताभाऊ कुलकर्णी म्हणाले की, पत्रकारांनी धाराशिव जिल्ह्यात नव्याने उभे झालेल्या उद्योगांची ओळख आपल्या लेखणीतून मांडली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. तसेच पत्रकारांना स्वतःला विकास पाहिजे असेल तर त्याची स्वतःची हक्काची जागा असली पाहिजे. कारण पत्रकारांना संपर्क साधण्यासाठी ते अतिशय महत्त्वाचे साधन असून त्याचा अनेकांना फायदा होत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे पत्रकारांनी विकास व उद्योगांची मांडणी नव्याने करावी लागेल असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे पूर्वीच्या व आताच्या पत्रकारितेमध्ये फार मोठा बदल झाला असून दर मिनिटाला ब्रेकिंग न्यूज येत आहेत. त्या ब्रेकिंगमध्ये हॅपनिंग काय आहे का ? त्यापासून आपणाला काय मिळणार आहे का ? हे पाहण्याबरोबरच पत्रकारांनी बदलायला शिकले पाहिजे असे त्यांनी सांगितले. तसेच युवकाच्या पाठीवर थाप मारली तर तो चांगला उद्योजक होऊ शकतो असे नमूद करीत ते म्हणाले की, पत्रकारांनी दिवसाचा फक्त १०-१० मिनिटांचा वेळ उद्योगासाठी द्यावा. तर पत्रकारांनी केवळ पत्रकार न राहता उद्योजक व्हावे असे त्यांनी नमूद केले. महत्त्वाचे म्हणजे पत्रकारांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून आपली निर्माण केलेली कीर्ती ही त्याची सर्वात मोठी श्रीमंती असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच दिव्या भोसले म्हणाल्या की, व्हॉईस ऑफ मीडियाने पत्रकारांसाठी घर, पत्रकारांचा कौशल्य विकास, पाल्यांचे शिक्षण, आरोग्य व पेन्शन ही पंचसूत्री हाती घेऊन सुरुवात केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्याप्रमाणे.... अहद् तंजावर तहद् पेशावर अवघा मुलुख आपला... याप्रमाणे काम करून स्वराज्य निर्माण केले. अगदी त्याच पद्धतीने या संघटनेचे काम सुरू असून पत्रकार व पत्रकारितेचा दृष्टिकोन बदलावा यासाठी सकारात्मक पत्रकारिता करण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याचे त्यांनी विशेषत्वाने सांगितले. त्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन पत्रकारांसाठी उभा राहणे फार गरजेचे असल्याचे नमूद केले. तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये पत्रकारांची १०० घरे बांधण्याचा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आपला लढा आपल्यालाच लढावा लागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट करीत पत्रकारांनी एकत्रित राहून काम करावे असे आवाहन त्यांनी केले. तर संजय पाटील दुधगावकर म्हणाले की, व्हॉईस ऑफ मीडियाने सकारात्मक पत्रकारितेचा पाया भरला असून पत्रकार म्हणजे चीटिंग करणारा असलेली प्रतिमा पुसून टाकली असल्याचे त्यांनी सांगितले. तर या संघटनेची पंचसूत्री अतिशय चांगली व वास्तव असून या माध्यमातून जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये जागृती निर्माण झाली असून सदस्यांच्या संख्येमध्ये वाढत होत असल्याने ही अतिशय चांगली बाब असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे जिल्ह्यात दुष्काळाच्या झळा मोठ्या प्रमाणात बसत असून दुष्काळी योजना राबविण्यासाठी प्रशासनाने अजूनही पावले उचलली नाहीत. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीच्या काळामध्ये दुष्काळाच्या प्रश्नावर पत्रकारांनी सातत्याने आपला आवाज उठवावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी साप्ताहिक विंगच्या जिल्हा संघटकपदी मयूर काकडे यांना निवडीचे पत्र देण्यात आले. तर रमजान पठाण व लतिफ शेख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड काढून देण्यासाठी ई-केवायसीचे जिल्हा व्यवस्थापक रमजान पठाण, लतिफ शेख, इंडिया पोस्ट पेमेंटस बँकेचे वरिष्ठ शाखा प्रबंधक चंद्रकांत झेंडे, सहाय्यक प्रबंधक अमर बावीकर, किशोर लोंढे, सूर्या खंडागळे, बालाजी लोमटे, महेश देशपांडे, प्रवीण बेडके, सत्यजित साडेकर, अनिकेत कोळगे, स्नेहल कांबळे, प्रतीक्षा घुगे, अमिता दंडनाईक, मयूर जंगले यांनी दोन्ही कार्ड काढण्याचे काम केले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे यांनी तर सूत्रसंचालन शरद अडसूळ व तानाजी घोडके यांनी तर आभार कुंदन शिंदे यांनी मानले. यावेळी ३०० पेक्षा जास्त पत्रकारांचा विमा व आयुष्यमान भारत योजना कार्ड काढण्यात आले. या कार्यक्रमास पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसवराज पाटील यांचे आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडून स्वागत



मुरूम दि.४ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा दबदबा असणारे बसवराज पाटील यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा देऊन कमळ हाती घेतल्यानंतर प्रथमच मुरूम शहरात आगमन झाले. त्यांच्या निवासस्थानी जाऊन हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बसवराज पाटील यांचे शनिवारी (ता. २) रोजी भव्य पुष्पहार, शाल, फेटा घालून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी औसा, निलंगा तालुक्यातील शेकडो गाड्यांच्या ताफ्यासह मुरूम शहरात आगमन होताच शहर भाजपमय झाल्याचे दिसून येत होते. या सत्काराला उत्तर देताना बसवराज पाटील म्हणाले की, गेल्या ४० वर्षात पक्षाचा एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम केले. हे करत असताना मी सामान्य जनतेचा विकास, त्यांना अधिक न्याय कसा देता येईल, याकडे लक्ष दिले. राजकारणापेक्षा समाजकारण महत्त्वाचे मानून मी काम करत राहिलो. आता भाजपात प्रवेश केल्याने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या भूमिकेला डोळ्यासमोर ठेवून मी पक्षात प्रवेश केला आहे. नरेंद्र मोदी यांचे देशाभिमान व विकासाभिमुख नेतृत्व डोळ्यासमोर ठेवून पवार व मी एकत्रित हा विकासाचा रथ पुढे घेऊन जाणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी त्यावेळी केले. आ. अभिमन्यू पवार म्हणाले की, बसवराज पाटील यांच्या रूपाने एक मोठे व्यक्तिमत्व भाजपाला मिळाले आहे. तेव्हा धाराशिव-लातूर जिल्ह्यालाच नव्हे तर सबंध मराठवाडा व कर्नाटक राज्यातील भाजप पक्षाला मोठी ताकद आणि बळ मिळणार आहे. पक्ष वाढीसाठी व विकासासाठी आम्ही दोघेही प्रयत्न करू. बसवराज पाटील हे मला मोठ्या बंधूसारखे असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी अधिक वेगाने काम करण्यास तयार असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. यावेळी युवानेते अँड. परिक्षीत पवार, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, युवानेते शरण पाटील, शिरीष उटगे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, विधानसभा प्रभारी संतोषअप्पा मुक्ता, मार्केट कमिटीचे चेअरमन शेखर सोनवणे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष किरणअप्पा उटगे, भाजप शहराध्यक्ष सुनिलअप्पा उटगे, युवराज बिराजदार, ज्ञानेश्वर वाकडे, सुधीर पोतदार, युवराज गोरे, सदाशिव जोगदंड, नितीन पाटील, ओम बिराजदार, बंडू कोदरे, काकासाहेब मोरे, भीमाशंकर राचट्टे, संगमेश्वर ठेसे, बसवराज धाराशिवे, हणमंत राचट्टे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार युवानेते शरण पाटील यांनी मानले. यावेळी हजारोच्या संख्येने विविध गावातून आलेले पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## कायद्च्या ज्ञानवृद्धीसाठी नवनवीन संशोधने आवश्यक - डॉ. दिक्षीत




धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) – न्यायिक क्षेत्रात चुका आणि शिका त्याचबरोबर नवीन वकिलांच्या कायदे विषयक ज्ञानवृध्दीसाठी नवनवीन संशोधने आवश्यक आहेत. विधी महाविद्यालयातील प्रा. डॉ. संजय अंबेकर यांनी आपल्या संशोधनातून लिहिलेले लिगल रिसर्च मेथडॉलॉजी पुस्तक विधी विद्यार्थी आणि नूतन वकिलांसाठी वरदान ठरेल, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसराचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रशांत दिक्षीत यांनी व्यक्त केले.

जिल्हा विधीज्ञ मंडळाच्या सभागृहात गुरूवारी येथील बापूजी साळुंके विधी महाविद्यालयातील सहाय्यक प्रा. डॉ. संजय अंबेकर लिखित लिगल रिसर्च मेथडॉलॉजी पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास दिवाणी न्यायाधीश बी.यु. चौधरी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव वसंत यादव, विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ऑड. रवींद्र कदम, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कायला कृष्णमूर्ती, ज्येष्ठ विधीज्ञ ऍड. रामचंद्र गरड, डॉ. सहदेव रसाळ, डॉ. पंकज शिनगारे, राजेंद्र अत्रे, ऍड. नितीन भोसले, डॉ. शिवाजीराव गायकवाड, प्रा. माधव उगीले, स्वाती देशमुख, लेखक प्रा. डॉ. संजय अंबेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात लेखक प्रा. डॉ. आंबेकर यांनी, पुस्तक लिहिण्यासाठी मिळालेली प्रेरणा, उद्देश तसेच पुस्तकाची उपयोगिता याबाबत माहिती दिली. प्राचार्य डॉ. कायला कृष्णमूर्ती यांनी उपस्थितांना पुस्तकाची उपयोगिता आणि महत्व पटवून दिले. यावेळी विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष ऍड. कदम, ऍड. गरड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रृती जाधव यांनी तर आभार ज्ञानेश्वरी जाधवर यांनी मानले. कार्यक्रमास ऍड. एस.डी. बाबरे, ऍड. राहुल जाधव, विधीज्ञ मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, विधी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते.

## शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने डॉ. पुराणे सन्मानित




मुरूम दि.४ (प्रतिनिधी) – उमरगा तालुक्यातील मुरूम येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष पत्रकार डॉ. रामलिंग काशिनाथ पुराणे यांना दि.०२ मार्च वार शनिवार रोजी संगमनेर येथील संजीवनी फौंडेशनच्या वतीने सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ या पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र,सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. दि.२ रोजी संगमनेर येथील मालपाणी हेल्थ क्लब येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात रोहित वाकचौरे, नाशिक पदवीधर मतदार संघ माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संगमनेर नगर परिषदेचे माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, विवेक कोल्हे, कृष्णराज महाडिक, शिक्षण महर्षी लक्ष्मण पटाडे, संजीवनी फौंडेशन अध्यक्ष ज्ञानेश्वर सानप आदींच्या उपस्थितीत डॉ.पुराणे यांना सहपरिवार सन्मानित करण्यात आले. डॉ.पुराणे यांचे सतत सामाजिक कार्यात चळवळ चालू असते, जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे अनेक लढा यशस्वी झाले आहेत, त्यांना यापूर्वी सामाजिक कार्यातील डॉक्टरेट,समाजभूषण, कोरोना योद्धा,जननायक, समाजचिंतक, लोकतंत्र के प्रहरी अशा विविध उपाधीने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ.पुराणे यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**राजा शिवछत्रपती यांनी सर्व समावेशक जनतेसाठी कार्य केले. त्यांची प्रेरणा म्हणजे एक ऊर्जास्रोत आहे. आज मला शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खऱ्या अर्थाने आतापर्यंत मिळालेल्या पुरस्कारापैकी शिवछत्रपती पुरस्कार माझ्यासाठी अनमोल ठेवा असेल, राजा शिवछत्रपती यांची प्रेरणा घेऊन माझे सामाजिक कार्य चालू ठेवेन व समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत लढत राहीन असे डॉ.रामलिंग पुराणे यांनी सांगितले.**

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com



# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत प्रमोद हुडगे जिल्हा स्तरावर द्वितीय

शिरूरआनंतपाळ / प्रतिनिधी- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे,.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३.२०२४ मध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आटोळा तालुका चाकूर येथील उपक्रमशील अध्यापक प्रमोद शिवराज हुडगे यांनी सादर केलेल्या उपक्रमास जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र , स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.. इंग्रजी विषयाची शब्द संपत्ती व वाक्यरचना या संदर्भातील नवोपक्रम त्यांनी सादर केला होता. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या सन्माननीय प्राचार्या डॉ भागिरथी गिरी ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ जगन्नाथ कापसे,ज्येष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे , अधिव्याख्याता इमाम मिर्झा , योगेश्री नाडे , घनश्याम पौळ उपस्थित होते.. गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप ,डायटचे अधिव्याख्याता संतोष ठाकूर,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवहार धुमाळे,मुख्याध्यापक विलास कस्तुरे, सुभाष केंद्रे, वसंतराव ढगे, विरभद्र बावगे, गणपती केंद्रे, प्रमोद बिराजदार, बळीराम बोळेगावे, आनंद चव्हाण, ज्योती बिराजदार, आदींनी अभिनंदन केले.

# ध्येय निश्चित केल्यास यश हमखास : दराडे



शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी- विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून भविष्य घडविण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी केल्यास यश हमखास मिळते, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी केले.

तालुक्यातील तळेगाव (दे.) येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अ‍ॅड. सुतेज माने होते. यावेळी प्रमुख पाहुणे विद्यापीठाच्या 'रासेयो'चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, विभागीय समन्वयक डॉ. सुभाष बेंजलवार, डॉ. केशव अलगुले उपस्थित होते. मंचावर प्राचार्य डॉ. अरुण धालगडे, सरपंच कांताबाई कांबळे, उपसरपंच जगदिश सूर्यवंशी, कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडुरंग मुठ्ठे उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक दराडे म्हणाले, आजचे युवक व्यसनात गुंतले आहेत. व्यसन करण्यासाठी पैसे मिळत नसतील तर वाईट मार्गाचा अवलंब करतात. वेळप्रसंगी चोरी करून आपल्या गरजा पूर्ण करतात, ही बाब चिंताजनक आहे. मुलींनी गैरवर्तन करणाऱ्या मुलांपासून दूर राहावे व आपले करिअर घडवावे. स्पर्धा परीक्षेची तयारी करून विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळवाव्यात, असे आवाहन यावेळी दराडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

यावेळी डॉ. करजगी, डॉ. बेंजलवार, डॉ. अलगुले, बाळकृष्ण सूर्यवंशी, अ‍ॅड. माने, प्राचार्य डॉ. धालगडे, सूर्यवंशी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिबिरार्थी स्वयंसेवक आसावरी चामले, मयुरी बावलगावे यांनी शिबिरातील सात दिवसांत आलेले अनुभव कथन केले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमोल इंगळे यांनी केले. यशस्वीतेसाठी सुरेंद्र कुंभार, श्रीकांत नागटिळक, तानाजी शिंदे, पंडीत लवटे, गणेश सूर्यवंशी कालिदास सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

## ग्रामीण जीवनाचे राहणीमान उंचावल्यास भारत लवकरच विकसित राष्ट्र होईल

लातूर / प्रतिनिधी- भारतातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात त्यांचे सर्वांगीण जीवनमान उंचावले तरच भारत विकसित राष्ट्र होईल असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नित राष्ट्रीय सेवा योजना, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, जवळा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष युवक शिबिर मौजे जवळा बु. येथे आयोजित करण्यात आले आहे या शिबिरात कृषी मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपिठावर डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. व्यंकट दुडीले, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आदीची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. ठोंबरे म्हणाले की, देशाचे मानवी संसाधन, लोकसंख्या नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा विनियोग झाला पाहिजे. देश विकासात मानवी संसाधनाचे विशेष महत्त्व असते. ग्रामीण जीवनात सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थिती अत्यंत बिकट आहे. शहरे मोठी होत चालली आहेत आणि खेडी ओस पडत आहेत. ग्रामीण भागातील आहार विहाराचे अनेक प्रश्न सातत्याने भेडसावत आहेत अशा वेळेला शासनाने जाणीवपूर्वक ग्रामीण भागाकडे लक्ष केंद्रित करून त्यांचा विकासाचा ध्यास घेतला पाहिजे तरच आत्मनिर्भर भारताचे आणि विकसित राष्ट्राचे स्वप्न पूर्ण होईल असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, ग्रामीण भाग देशाच्या विकास विकासाची संजीवनी आहे.

# शिबीर्थानी बालविवाह विरोधी प्रतिबंधात्मक रॅलीतून केली जन जागृती

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी : तालुक्यातील तळेगाव ( दे ) येथे आयोजीत शिवनेरी महाविद्यालयाच्या विशेष वार्षीक शिबीरात विविध उपक्रमा पैकी एक म बाल विवाह प्रतिबंधात्मक म रॅलीचे दि . २ मार्च २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते . या रॅली मध्ये स्वयं सेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवीला व त्या बरोबरच जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यानी ही या रॅलीत स्वंय उत्सपुर्त पणे सहभागी होऊन . मानवी साखळी व्दारे विविध फलक ,बॅनर, घोषवाक्य, व घोषणा च्या माध्यमातुन या गंभीर प्रश्नाकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्षे केंद्रीत केले .



या पुरोगामी महाराष्ट्रात व विशेषताह मराठवाडयात परभणी हिंगोली नंतर लातूर जिल्हयाचे नाव बालविवाह संदर्भाने घेतले जाते . म्हणून या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराथ्यार्ने कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ पांडूरंग मुठ्ठे , प्रा डॉ . अमोल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष रॅलीचे आयोजन करून समाज प्रबोधना बरोबरच विविध घोष वाक्या व्दारे व तोंडी घोषणा देऊन जनजागृती केली त्या बरोबरच .तळेगाव (दे ) येथील बालविवाहाच्या संदर्भाने जवळपास ३१० कुटुंबाचे सर्वेक्षण करून वय वर्षे १२ ते १८ वयातील मुलींच्या सर्वेव्दारे मुलीच्या शिक्षणा व बाल विवाह संदर्भात शोध घेण्याचा प्रयत्न केला . वय वर्षे १२ ते १८ वर्षातील मुली सध्या काय करतात . या अनुषंगाने शोध घेण्यात आला . त्या मध्ये त्यांचे लग्न झाले आहे का ? . का शिक्षण सोडून घरी बसल्या आहेत? . शिक्षण सोडून घरी बसल्या असतील तर त्यांना पुढील शिक्षण घेण्याचे समउपदेशन शिबीरार्थी विद्यार्थ्याने केले . व बालविवाहाचे दुष्परिणाम त्यांच्या कुंटूब प्रमुखांना सांगीतले .

ही रॅली यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ पंडूरंग मुठ्ठे, डॉ . अमोल इंगळे, जिल्हा परिषद शाळेचे बाळकृष्ण सुर्यवंशी सर , पाटील सर व शिबीरार्थी विद्यार्थ्यानी परिश्रम घेतले .

# उद्या कैलास नगर येथे शिवदिक्षा संस्कार सोहळा





लातूर / प्रतिनिधी :लातूर तालुक्यातील हरंगुळ बु स्थित कैलास नगर येथील शिखर शिंगणापूर शिवालय मंदिर येथे उद्या ६ मार्च बुधवार रोजी बर्दापूर मठसंस्थांनचे ष. ब्र १०८ चन्नबस्व गुरू महालिंग शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती व हस्ते शिवदिक्षा संस्कार सोहळा होणार असुन या संस्कार सोहळ्याचा शिवलिंग धारण करु ईच्छीणाऱ्या भाविक भावित्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर विश्वस्थांनी केले आहे. यासाठी शिवदिक्षा घेऊ ईच्छुणाऱ्या व वयाचे ८ वर्षे पूर्ण करणाऱ्या भाविकांना याचा लाभ घेता येईल अशी माहिती मंदिर विश्वस्थ व आयोजकांकडून देण्यात आली आहे.

# स.पोलीस उपनिरीक्षक मिरदोडे यांचा सत्कार



देगलूर(प्रतिनीधी):येथील पोलिस स्टेशन मधील सहायक पोलिस उपनिरीक्षक राजाराम चंदरराव मिरदोडे हे नुकतेच सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा वीरशैव समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मिरदोडे हे पोलीस विभागात कार्यरत असून सुद्धा अध्यात्मिक क्षेत्रात वेळ देतात. ते स्वतः उत्तम गायन करण्यासोबतच तबला,पेटी,पखवाज, टाळ मृदंग वाजविण्यात तरबेज आहेत. मागील २५ वर्षापासून ते दर सोमवारी प्रकाशअप्पा कोटचीरकर यांच्या घरी भजनास हजर राहून सहभाग घेतात.

वीरशैव समाजाच्या या भजनी मंडळातर्फे त्यांचा स्वागत करण्यात आला. यावेळी प्रकाशअप्पा कोटचिरकर,मारोती चीटमोगरे,बसवंत धर्माजे, कल्याण पाटील कुराडे,यल्लाप्पा कोलमकर आदी उपस्थित होते.

# तक्षशिला बुद्ध विहार येथे बुद्ध मूर्तीचा अनावरण सोहळा संपन्न

अहमदपूर/ प्रतिनिधी- तालुक्यातील मौजे काळेगाव येथे तक्षशिला बुद्ध विहार या ठिकाणी थायलंड देशाच्या वतिने पूज्य भिकू खेमसिंग थेरो यांनी दान स्वरूपात दिलेली दहा फूट उंचीची आकर्षक बुद्ध मूर्ती या ठिकाणी बसवण्यात आली आहे.या बुद्ध मूर्ती चा अनावरण सोहळा दिनांक २ मार्च रोजी भिख्खू संघ व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सकाळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.भिख्खू संघास भोजनदान त्याच बरोबर उपस्थित बौद्ध उपासक उपासिका यांना भोजनदान देण्यात आले.त्या नंतर उपस्थित उपासक उपासिका यांना भिख्खू संघाकडून धम्मदेशना देण्यात आली.

या कार्यक्रमांसाठी महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे उपस्थित होते.तर प्रमूख पाहूणे म्हणून आ.बाबासाहेब पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे,प्रदेश प्रवक्ते गणेश हाके पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख , इंजिनियर विश्वजीत अनिलकुमार गायकवाड ,व्ही एस पॅंथर चे विनोद खटके, डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, गोपिनाथ जोंधळे आदीची प्रमुख उपस्थिती होती.या तथागत भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीच्या अनावरण सोहळ्यास सबंध लातूर जिल्ह्यातून त्याचबरोबर बीड-परभणी -नांदेड इत्यादी जिल्ह्यातून श्रद्धावान उपासक व उपासीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मौ.शिऊर ता.निलंगा येथील कर्नल सचिन रंडाळे कारगिल युद्धातील लढवय्ये सैनिक असून, या युद्धामध्ये ५ पाक सैनिकांना एमसदनी पाठवले होते,या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांना शौर्य चक्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तरी आज राष्ट्रीय सुरक्षा दिन निम्मित यांच्या कार्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा!! कर्नल सचिनजी रंडाळे यांचा महादेव विद्यालय धनेगाव येथे प्राचार्य रामलिंग मुळे यांनी सत्कार केला.**

# इंडियन मेडिकल असोसिएशनच्या आयएमएथॉन २०२४ मॅरॅथॉनला आबालवृद्धांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर / प्रतिनिधी- इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर तर्फे आयोजित आयएमएथॉन लातूर २०२४ मॅरेथॉन स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद लाभला. ३ किलोमीटर, ५ किलोमीटर, १० किलोमीटर व २१ किलोमीटरसाठी झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये १५०० पेक्षा जास्त धावपटूंनी उत्साहाने व हिरीरीने सहभाग नोंदविला. आयएमए लातूरतर्फे आयएमएथॉन लातूर २०२४ च्या चवथ्या आवृत्तीची जय्यत तयारी करण्यात आली होती. आयएमए लातूरच्या वतीने ह्या मॅरेथॉनची थीम Empower Her, Elevate All, Run for Equality in every Step! अर्थात तिला सक्षम करा, सर्वांना उन्नत करा, प्रत्येक टप्प्यावर समानतेसाठी धावा! अशी ठेवण्यात आलेली होती. आठ मार्च रोजी होणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर स्त्री शक्तीचे सक्षमीकरण आणि समानता अशी थीम आयोजकांनी विचारपूर्वक निवडलेली होती.





२१ किलोमीटर व १० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात लातूरच्या पहिल्या महिला जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे व स्पर्धेचे मुख्य प्रायोजक लातूर अर्बन को-ऑ. बँक लि. , लातूरचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी नमन गोयल, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे यांच्या हस्ते करण्यात आली. बिडवे लॉन्स, औसा रोड येथून सुरू झालेल्या या स्पर्धेमध्ये २१ किलोमीटर साठी २४० व दहा किलोमीटर साठी ६५० धावपटूंनी सहभाग नोंदवला. ५ किलोमीटर व ३ किलोमीटर च्या मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात लातूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व मॅरेथॉन स्पर्धेचे सहप्रायोजक असलेले सुभाष कासले, क्वॉलिटेक इलेव्हेटर्स, भारती व गित्ते ग्रुपचे धर्मवीर भारती व . नागनाथ गित्ते,

कौशल्या अॅकॅडमी लातूरचे पाटील , कीर्ती गोल्डचे भुतडा, सनरिच एक्काचे मुंदडा, हॉटेल सिटी सेंटरचे नंदकिशोर अग्रवाल, हॉटेल भोजचे मिनू अग्रवाल, बिडवे लॉन्सचे गणेश बिडवे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व धावपटूंनी स्पर्धा सुरू होण्याअगोदर एकत्र येऊन अंकिता जोधवानी यांच्या नेतृत्वाखाली झुंबा करत वॉर्म अप केला. त्यामुळे स्पर्धकांमध्ये उत्साह संचारला. फ्लॅग ऑफ झाल्यानंतर चढाओढीने धावत लवकरात लवकर स्पर्धा पूर्ण करण्याची लगबग दिसून येत होती. मॅरेथॉनच्या मार्गावर आयोजकांनी चोख तयारी ठेवली होती. मॅरेथॉनच्या मार्गावर सहा ठिकाणी हायड्रेशन पॉईंट जेथे पिण्याचे पाणी, एनर्जी ड्रिंक व स्नॅक्सची व्यवस्था करण्यात आली होती. त्यासाठी नेमण्यात आलेले स्वयंसेवक सर्व धावपटूंचा उत्साह वाढवत होते तसेच मार्गातील ढोल ताशा व लेझीम पथक, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, पोद्दार स्कूल, माउंट लिटेरा झी स्कूल, जे एस पी एम स्वामी विवेकानंद विद्यालय येथील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या बँड पथकांनी देखील मार्गामध्ये धावपटूंना ऊर्जा देत त्यांचा उत्साह वाढवला.

फिनिशिंग लाइन जवळ फोटो काढताना व मेडल घेताना सर्व धावपटूंच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद ओसंडून वाहत होता. बक्षीस वितरण सोहळ्यासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ह्या प्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत करून आयएमएथॉन लातूर २०२४ च्या यशस्वीतेसाठी हातभार लावणाऱ्या सर्वांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. बक्षीस वितरण सोहळ्यावेळी डिजेच्या तालावर व टाळ्या वाजवून विजेत्यांचे स्वागत करण्यात आले. स्पर्धेचे सूत्रसंचालन समीर बजाज व डॉ. आशिष चेपुरे यांनी केले.खुल्या गटामध्ये ३ किमी स्पर्धेमध्ये मुलांमध्ये आर्यन नागरगोजे, अविनाश कांडगिरे , अथर्व अर्जुने व मुलींमध्ये जननी शिंदे, सानवी वाघमारे, आणि कैरा नावंदर यांनी अनुक्रमे प्रथम दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. साठ वर्षांवरील स्पर्धकांमध्ये पुरुष गटात लाल मोहम्मद उजेडे, सुरेश भुतडा, सुभाष मल्लाडे व स्त्री गटामध्ये कुसुम पाटील, डॉक्टर सरिता मंत्री व शकुंतला रेड्डी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांक पटकावला. पाच किलोमीटर स्पर्धेमध्ये खुल्या गटामध्ये पुरुषांमध्ये शुभम भोसले, आदित्य पोटले, आरुष यादव व महिला गटामध्ये राजनंदिनी सोमवंशी, ऋतुजा सोनी, आदिती थोरमोठे यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

पाच किलोमीटर डॉक्टर गटामध्ये पुरुषांमध्ये पार्थ खानापूरकर, डॉक्टर राहुल सूळ, डॉक्टर दीपक पाटील यांनी तर स्त्री गटामध्ये अनन्या पांचाळ, डॉक्टर शीतल अभंगे व तनिष्का पाटील यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

दहा किलोमीटर खुल्या गटामध्ये पुरुषांच्या गटात निवृत्ती गुडेवार रितेश धोत्रे व गौरव कांबळे व स्त्री गटामध्ये दिव्या राठोड, निकिता म्हात्रे व श्रावणी जगताप यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. दहा किलोमीटर डॉक्टर्स व कुटुंबीय या गटामध्ये डॉक्टर मुरलीधर जाधव, डॉ. अमृत शिवडे, डॉ. सचिन बाबळसुरे तर महिला गटामध्ये डॉ. वैशाली कुलकर्णी डॉ. क्रांती साबदे, डॉ. रचना जाजू यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

२१ किलोमीटर च्या हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये खरोखर चुरस बघायला मिळाली. खुला गटातून गणेश सुरवसे वैभव कांबळे व गंगाधर सोमवंशी व स्त्री गटातून पुष्पा राठोड, परिमला बाबर व राणी लोया यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. २१ किलोमीटर डॉक्टर्स गटामधून पुरुषांमध्ये डॉ. दिनकर बिरादार, डॉ. विक्रम सूर्यवंशी व डॉ. महेश कदम तर महिला गटामधून डॉ. वृषाली बंडगर, डॉ. वैशाली इंगोले, डॉ. रचना बियाणी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. २१ किमी स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक १२ हजार रुपये, द्वितीय ८ हजार, तृतीय ६ हजार रुपये असे जाहीर करण्यात आले. १० किमी. अंतरासाठी प्रथम पारितोषिक ७ हजार, द्वितीय ५ हजार तर तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये जाहीर करण्यात आले. स्पर्धकांना सुंदर असे मेडल्स, सर्टिफिकेट व चांगले टी-शर्ट मिळाल्यामुळे सर्व धावपटूंचा उत्साह व ऊर्जा वाखाणण्यासारखी होती. धावून आल्यानंतर रिकव्हरी साठी फिजिओथेरपी ची व्यवस्था करण्यात आली होती व फर्स्ट एड किट आणि पेन किलर स्प्रे चा वापर करून धावपटूंचा थकवा दूर करण्यात डॉ. पल्लवीं जाधव, डॉ. वीरेंद्र मेश्राम व डॉ. गौरव भटनागर यांच्या नेतृत्वाखाली फिजिओथेरपी टीमने महत्त्वाची भूमिका बजावली. चवदार अशा अल्पोपहाराची सोय आयोजकांकडून करण्यात आल्यामुळे सर्व धावपटूंनी आनंद व समाधान व्यक्त केले.

स्पर्धेच्या मार्गावर वाहतूक पोलीस नियंत्रण शाखा, पोलीस यंत्रणा, महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज होती. पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी सर्व यंत्रणांशी समन्वय साधत धावपटूंना कुठलीही अडचण येणार नाही याची काळजी घेतली. आयएमएथॉन लातूर २०२४ च्या यशस्वीतेसाठी लातूरचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, सचिव डॉ. आशिष चेपुरे, वूमेन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. प्रिती बादाडे, सचिव डॉ. प्रियंका राठोड, उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. हर्षवर्धन राऊत,, कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. आरती झंवर, डॉ. चांद पटेल, डॉ. ब्रिजमोहन झंवर, क्रीडा समितीचे सदस्य डॉ. अजय जाधव, डॉ .चेतन सारडा, डॉ. विक्रम सारडा, डॉ. शितल ठाकूर - टीके, डॉ. सतीश हंडरगुळे, डॉ. चंद्रशेखर अष्टेकर , डॉ. ज्योती सूळ, डॉ. केतकी चवंडा यांसह सर्व आयएमए पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि **जाहीरनामा** दि. ०८/०१/२०२४

ज्याअर्थी अर्जदार उमाकांत बाबुराव भालके वय ५५ वर्षे रा. हनुमान नगर उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांचा त्यांचे वडील नामे बाबुराव संग्राम भालके रा. नळगीर ता.उदगीर जि.लातूर यांचा मृत्यू दिनांक १९/१०/२०१७ रोजी झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार उमाकांत बाबुराव भालके वय ५५ वर्षे रा. हनुमान नगर उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांचा त्यांचे वडील नामे बाबुराव संग्राम भालके रा. नळगीर ता.उदगीर जि.लातूर यांचा मृत्यू दिनांक १९/१०/२०१७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा वडील नामे बाबुराव संग्राम भालके रा. नळगीर ता.उदगीर जि.लातूर यांचा मृत्यू दिनांक १९/१०/२०१७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार त्यांचे वडील नामे बाबुराव संग्राम भालके यांचा मृत्यू दिनांक १९/१०/२०१७ रोजी नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नागलगाव ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १९/०१/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २०/०२/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि **जाहीरनामा** दि. २०/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार अमृत बापूराव नराचे रा. मोघा ता.उदगीर यांचा मुलगा नामे अथर्व अमृत नराचे यांचा जन्म दिनांक २५/०६/२००७ रोजी मौजे मोघा ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार अमृत बापूराव नराचे रा. मोघा ता.उदगीर यांनी त्यांचा मुलगा नामे अथर्व अमृत नराचे यांचा जन्म दिनांक २५/०६/२००७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १३/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा अमृत बापूराव नराचे यांचा जन्म दिनांक २५/०६/२००७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार अमृत बापूराव नराचे रा. मोघा ता.उदगीर यांचा मुलगा नामे अथर्व अमृत नराचे रा. मोघा यांचा जन्म दिनांक २५/०६/२००७ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मोघा ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०२/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २१/०३/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील रासेयोच्या स्वयंसेवकांनी केली ग्रामस्वच्छता



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ,उदगीर संचलित स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) विभागाच्या वतीने आयोजित विशेष वार्षिक शिबीर दिनांक ०१ मार्च २०२४ ते ०७ मार्च २०२४ दरम्यान मौजे देवर्जन (हत्तीबेट),हणमंतवाडी ता. उदगीर येथे होत आहे.या शिबिराच्या माध्यमातून हणमंतवाडी या गावात ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सदरील मोहिमेमध्ये रासेयोच्या स्वयंसेवकांनी गावकऱ्यांच्या मदतीने संपुर्ण परिसर स्वच्छ केला. यावेळी गावातील जनतेस स्वच्छतेचे महेत्व देखील सांगण्यात आले. ही स्वच्छतेची मोहीम राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमर तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. राहुल पुंडगे, प्रा. नयन भालेराव, रासेयो प्रतिनिधी वैष्णवी निटूरे, सुयश स्वामी,रितेश मरे,प्रथ्वीराज दावनीपुर्गे,विकास काकरे, रितेश मुळे, हर्षद बदनाले, प्रसाद कोंडापुरे यांनी सहभाग घेतला.

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि **जाहीरनामा** दि. २३/०१/२०२४

ज्याअर्थी अर्जदार सपना प्रकाश पवार रा. बोरताळा तांडा नागलगाव ता.उदगीर यांचा जन्म दिनांक २७/०५/१९९६ रोजी मौजे नागलगाव ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार अर्जदार सपना प्रकाश पवार यांनी त्यांचा जन्म दिनांक २७/०५/१९९६ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २७/०५/१९९६ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार सपना प्रकाश पवार यांचा जन्म दिनांक २७/०५/१९९६ रोजची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नागलगाव ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०१/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २४/०२/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि **जाहीरनामा** दि. ०८/०१/२०२४

ज्याअर्थी अर्जदार कविताबाई किशन राठोड (कविता रुपसिंग पवार) रा. बाराभाई तांडा खतगाव ता.मुखेड यांचा जन्म दिनांक २२/०२/१९८३ रोजी मौजे बोरताळातांडा नागलगाव ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार कविताबाई किशन राठोड (कविता रुपसिंग पवार) यांनी त्यांचा जन्म दिनांक २२/०२/१९८३ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २२/०२/१९८३ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार कविताबाई किशन राठोड (कविता रुपसिंग पवार) रा. बाराभाई तांडा खतगाव ता.मुखेड यांचा जन्म दिनांक २२/०२/१९८३ रोजची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय नागलगाव ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १९/०१/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २०/०२/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६८/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Kishan@Krishna Waghya Devkatte हे दिनांक १०.०२.१९९३ रोजी At. Marsangvi येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
Bapurao S/o. Kishan Devkatte, Age 65, Occu- Agri.
R/o Marsangvi, Tq.Jakot Dist.latur
यांनी खालील नमूद १ हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Bapurao S/o. Kishan Devkatte | 65 | Son |

अर्जदार याने Kishan@Krishna Waghya Devkatte या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Kishan@Krishna Waghya Devkatte यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०१/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १८/०४/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Satish@ Jaywant S/o Maruti Biradar हे दिनांक १७.११.२०२३ रोजी Dhondihipparga Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Bhagyashree W/o. Satish@Jaywant Biradar, Age 33 yrs, Occu. H.H.
2) Shreyash S/o. Satish@Jaywant Biradar, Age 11 yrs, Occu.Education
3) Jayash S/o. Satish@Jaywant Biradar, Age 08 yrs, Occu.Education
(Applicant No. 2 & 3 are minors U/g. of real mother applicant No. 1)
4) Laxmibai W/o. Amrutrao Biradar, Age 55 yrs, Occu. H.H.,
All R/o Dhondhipparge Tq.Udgir Dist.Latur.
यांनी खालील नमूद ४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Bhagyashree W/o. Satish@Jaywant Biradar | 33 | Wife |
| 2) | Shreyash S/o. Satish@Jaywant Biradar | 11 | Son |
| 3) | Jayash S/o. Satish@Jaywant Biradar | 08 | Son |
| 4) | Laxmibai W/o. Amrutrao Biradar | 55 | Mother |

अर्जदार याने Satish@ Jaywant S/o Maruti Biradar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Ram Baliram Daji यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०१/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १६/०३/२०२४


आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) (एस.एम.शेटे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवाणी न्यायलय क.स्तर, उदगीर




उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव




## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १३ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार पदमिनबाई भ्र. लक्ष्मण बिरादार ज्यापेक्षा मुलगा नामे मारोती पि. लक्ष्मण बिरादार हे दिनांक २१/०८/२००४ रोजी हंचनाळ ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | पदमिनबाई भ्र. लक्ष्मण बिरादार | ७० | आई |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १७/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ११/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
व.लिपिक (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १४ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार आजिंक्य पि. गोपाळराव निडवंचे ज्यापेक्षा वडील नामे गोपाळ व्यंकटराव निडवंचे हे दिनांक २१/०९/२०२० रोजी तळेगांव भो. ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | अजिंक्य पि. गोपाळराव निडवंचे | २२ | मुलगा |
| २) | आशा भ्र. गोपाळराव निडवंचे | ४५ | पत्नी |
| ३) | भाग्यश्री पि. गोपाळराव निडवंचे | २५ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १७/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ११/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
व.लिपिक (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १७ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार माधव पि. किशनराव बिरादार ज्यापेक्षा वडील नामे किशन मसाजी बिरादार हे दिनांक ३१/१०/२०२३ रोजी मौ. धनेगाव ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | माधव पि. किशनराव बिरादार | ४० | मुलगा |
| २) | सुमनबाई भ्र. किशनराव बिरादार | ६५ | पत्नी |
| ३) | सुवर्णा भ्र. संभाजी पाटील | ४५ | मुलगी |
| ४) | अंजली भ्र. नारायण इंद्राळे | ३८ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १२/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २०/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
व.लिपिक (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १८ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नारायण पि. विठ्ठलराव भंडे ज्यापेक्षा वडील नामे विठलराव पिराजी भंडे हे दिनांक ११/११/२०२३ रोजी मौ. मानकी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | नारायण पि. विठलराव भंडे | ६० | मुलगा |
| २) | मुरलीधर पि. विठलराव भंडे | ६५ | मुलगा |
| ३) | गोवर्धन पि. विठलराव भंडे | ५० | मुलगा |
| ४) | जनार्धन पि. विठलराव भंडे | ४५ | मुलगा |
| ५) | गोविंद पि. विठलराव भंडे | ४२ | मुलगा |
| ६) | शांताबाई भ्र. शिवराज नंदगावे | ४३ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १२/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २०/०३/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
व.लिपिक (सहा.अधिक्षक)

# येरगी मध्ये बालिका पंचायत राज उपक्रम संपन्न



देगलूर(प्रतिनीधी): तालुक्यातील येरगी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून मागील महिन्यात बालिका पंचायत राज ची स्थापना आली असून असे करणारी ही जिल्ह्यातील पहिली ग्राम पंचायत आहे.

आज बालिका पंचायत राज तर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.


या अनुषंगाने बाल विवाह प्रतिबंध,हुंडा प्रतिबंध,ग्राम स्वच्छता आणि आरोग्य चांगले राहावे यासाठी विविध उपाययोजना आणि जलव्यवस्थापन करण्याबद्दल चर्चा करण्यात आली. याविषयी सरपंच संतोष पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बालिका पंचायत राज चे सरपंच कुमारी योगिता वाघमारे,उपसरपंच नागमनी बरसमवार, ग्रामसेवक कु.महादेवी दानेवार,सदस्य रुद्रानी चेंडके, पूनम सूर्यवंशी,महादेवी गादगे,श्रीदेवी धाकपाडे, शिवकांता भुरळे, अंजली वाघमारे,स्वाती बरसमवार आदी उपस्थित होते.

यावेळी बालिका पंचायत राज चे सरपंच कुमारी योगिता वाघमारे यांनी वरील विषयी सर्व पदाधिकारी व गावकऱ्यांना गावातील स्वच्छता राखण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तसेच सर्व सदस्यांनी गावकऱ्यांना गावच्या विकासासाठी वार्षिक कर भरण्याचे आवाहन केले. तसेच बालिका सक्षमिकरणासाठी कराटे शिबिर ,अन्य स्वसंरक्षणासाठी शिबिरांचे आयोजन करण्याचा एकमताने ठराव घेतला. त्याला गावचे सरपंच संतोष पाटील यांनी व गावकऱ्यांनी सहमती दर्शविली.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच संतोष पाटील,ग्रामविकास अधिकारी राजेश तोटावाड सहित सर्व ग्रामपंचायत सदस्य ,शाळेचे शिक्षक ईश्र्वर वाडीकर, राहुल ढगे,आदींनी परिश्रम घेतले.

# विष्णुदास कर्वा यांचे निधन आज लातुरात अंत्यसंस्कार



लातूर : लातूर येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सत्यनारायणजी कर्वा यांचे लहान बंधू व कर्वा उद्योग समूह व फायब्रो प्लास्टचे संचालक लक्ष्मीकांत कर्वा व योगेश कर्वा यांचे वडील विष्णुदास विठ्ठलदास कर्वा यांचे सोमवारी सायंकाळच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्ष होते. स्व. विष्णुदास कर्वा यांनी स्टेट बँक हैदराबादमध्येही प्रमुख रोखपाल म्हणून कार्य केले होते. ते अत्यंत मनमिळावू स्वभावाचे व धार्मिक वृत्तीचे होते. आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाच्या जीवनात त्यांच्या परिवार स्नेही प्रवृत्तीमुळे अमुलाग्र बदल झालेला आहे. लातुरातील धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रात कर्वा परिवाराचा सिंहाचा वाटा आहे. परिवारातील सर्व सदस्यांच्या या कार्यामागे प्रसिद्धिपराङमुख राहून प्रोत्साहनपर कार्य ते सतत करत आलेले आहेत.

राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांचे ते अनन्य भक्त होते. लातूर शहरातील त्यांच्या कथा, व्याख्यान माला आयोजनामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता.

स्व. विष्णुदास कर्वा यांची अंत्ययात्रा मंगळवारी, दि. ५ मार्च २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता म मधुकोश म साईधाम या राहत्या घरापासून निघणार असून मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.



# पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर / प्रतिनिधी- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, लातूर शहर महानगरपालिका, लातूर आणि राष्ट्रीय सेवा योजना, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने ०३ मार्च २०२४ पोलिओ रविवार दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलीओवर विजय दरवेळी अभियानांतर्गत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात खंडोबा गल्ली परिसरातील नागरिकांनी आपल्या पाच वर्षा पर्यन्त आणि त्यावरील बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील ग्रंथालयासमोर याचे नियोजन करण्यात आले होते.

स. ७.३० वा. पासून ते सायंकाळी ६.०० वा.पर्यंत या बुधवर पल्स पोलिओ लसीकरण करण्यात आले दुपारपर्यंत पाच वर्षापर्यंतच्या १२० बालकांना तर पाच वर्षा नंतरच्या ०८ बालकांना असे एकूण १२८ बालकांना लसीकरण करण्यात आले. या लसीकरण बुथला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सर्व आरोग्य कर्मचारी, नागरिक, शिक्षकेतर कर्मचारी आणि बालकांचे अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी जी. एन. एम. वैशाली राठोड, साक्षी गायकवाड, सहशिक्षक सुनिता कुलाल, आशा वर्कर केशरबाई मुलगे आणि डी. एन. एम. एम. एल गुरव, रंगनाथ लांडगे आणि गोपाळ तिरमले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# भंडारवाडी सोसायटी व ग्रामपंचायत सदस्याचा शिवसेना (ठाकरे) मध्ये प्रवेश

धाराशिव दि.४ (प्रतिनिधी) - केंद्रात नरेंद्र मोदी सरकारकडून प्रत्येक वेळी शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याचा भाव ६५ वरुन १५ वर आला, दुधाचे भाव गडगडले तसेच सोयाबीन ११ हजार रुपयांवरुन ४५०० वर आले. तर कारखान्यावर इथेनॉल निर्मितीसाठी बंधने घातले. यामुळे केंद्र सरकारवर शेतकऱ्यांचा तीव्र राग असून याला केंद्र सरकार जबाबदार असल्यामुळे आम्ही भाजपमधून शिवसेना (ठाकरे) मध्ये प्रवेश करत असल्याचे सांगत भंडारवाडी येथील ग्रामपंचायत सदस्य व विविध कार्यकारी सोसायटीच्या सदस्यांनी खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आ कैलास पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

केंद्र सरकार खाजगी उद्योजकाच्या उदा. सिमेंट, स्टील तसेच शेतीसाठी लागणारे अवजारे बि-बियाने, खते यावर कुठलीही निर्बंध लावत नाहीत मात्र शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या मालावर महागाईचा बाऊ करुन निर्बंध लावते व त्याचा परीनाम शेतकऱ्याचा उत्पादनाचे भाव कमी होण्यावर होते. यामुळे शेतकरी आर्थीक संकटात सापडत असून वाढत्या शेतकरी आत्महात्या शासनाची ही धोरणे कारणीभुत आहे. त्यामुळे आपण नेहमीच शेतकऱ्यांच्या बाजूने लोकसभेत भूमिका मांडली आहे. मात्र याबाबत केंद्र सरकार उदासीन असून शेतकऱ्याच्या कल्याणासाठी कुठलेही ठोस पाऊल न उचलता केंद्र सरकार शेतकऱ्यावर अन्याय करत आहे. यामुळे येणाऱ्या निवडणुकीत शेतकऱ्यांनी केंद्र सरकारला धडा शिकवावा असे आवाहन खा राजेनिंबाळकर यांनी केले. यावेळी द्वारकानाथ माळी, सरपंच सागर एडके, संगमेश्र्वर पाटील, दयानंद माळी, राजभाऊ देशमुख, रणधीर पाटील,विभागप्रमुख राजेंद्र तुपे, युवासेना उपतालुकाप्रमुख अविनाश इंगळे,हिज्जू भाई काझी, उपसरपंच राहुल माळी, गणेश शिनगारे वि का सोसायटी चेअरमन,ग्रा पं सदस्य धनंजय पाटील, संजय जाधव,वि का सोसायटी सदस्य धनराज भारती, महादेव धोंगडे, बाळासाहेब सलगर भाऊराव माळी, विष्णू भंडारे, श्रीकांत धोंगडे माजी सरपंच, धनंजय तवले, मेघराज माळी, सुदर्शन सुरवसे, बालाजी माळी, गोपाळ माळी, लक्ष्मण सुरवसे, गौतम साबळे, अनिकेत गुळमिरे, सुजित भोजने, कुणाल पाटील,ओम शिनगारे, अजय डोलारे, राम कोळी, पद्माकर मसे, कृष्णा सुरवसे, अभिषेक शिनगारे, गुरुपाल कोळी,गोकुळ माळी, गणेश माळी, रितेश साबळे, प्रथमेश भालेराव, आत्माराम माळी, सुनील पवार, आदिनाथ माळी, राम बिचकुले, राहुल पवार, प्रशांत पवार, बालाजी अंधारे, सोमनाथ एडके, विजय साबळे, उमाकांत एडके, आकाश घोडके, सुनील एडके, विक्रम एडके, रोहित पाटील, वैभव काकडे, रोहन माळी, जीवन काकडे, दत्ता जोगदंड, शरद पवार, कृष्णा पांचाळ रोहन भंडारे, अमोल माळी, महेश माळी, कपिल मसे, बाळासाहेब गायकवाड, मंगेश कदम, जीवन माळी, गजानन पाटील, रवींद्र भंडारे, माऊली एडके, धीरज माळी, लक्ष्मण बिचकुले, विशाल पवार आदींसह अनेकांनी प्रवेश केला.

पान १ वरून

## तरुणांना...

समजणारे भाजपा सरकार सातत्याने कंत्राटी पद्धतीला प्रोत्साहन देत आहे, जिथे ना सुरक्षा, ना सन्मान, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

नोकरी तरुणांचा हक्क

रिक्त पदे हा देशातील तरुणांचा हक्क असून, भरती प्रक्रियेसाठी आम्ही ठोस योजना तयार केली आहे. भारताचा संकल्प आहे की, आम्ही तरुणांसाठी नोक-यांचे बंद दरवाजे उघडू. बेरोजगारीचा काळा काळ दूर होऊन तरुणांच्या भाग्याचा सूर्योदय होणार आहे, असा विश्र्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.

## बँक कर्मचाऱ्यांना....

आरबीआयच्या म्हणण्यानुसार, सध्या प्रत्येक बँकेत रविवारी साप्ताहिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ५ दिवस सुट्टीचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर महिन्यातील सर्व शनिवारी कामकाज बंद राहणार आहे.

## दिल्लीत...

माणसांचा मतदानावरुन आणि सरकारवरुन विश्र्वास उडाला होता. मात्र, अरविंद केजरीवाल आशेचा नवा किरण बनून आले. प्रामाणिकपणा आणि सत्य हा विश्वास देत आम्ही सरकार बनवले.

दिल्ली बजेटमधील महत्त्वाचे निर्णय

केजरीवाल सरकारने बजेटमध्ये मुख्यमंत्री महिला सन्मान योजनेची घोषणा केली आहे. त्यानुसार, १८ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या महिलांना दरमहा १००० रुपये देण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री महिला सन्मान योजनेसाठी दिल्ली सरकारने यंदाच्या बजेटमध्ये २००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

येथील केजरीवाल सरकारने शिक्षण क्षेत्राच्या बजेटमध्ये दुप्पटीने वाढ केली आहे. यापूर्वी दिल्लीचं शिक्षण बजेट ६५५४ कोटी रुपये एवढे होते. आता, २०२४-२५ मध्ये दिल्ली सरकारने शिक्षण क्षेत्रासाठी १६,३९६ कोटींचं बजेट सादर केलं आहे.

आरोग्य विभागासाठी ८६८५ कोटी रुपयांची तरतूद दिल्ली सरकारने बजेटमध्ये केली आहे.

## योगी...

कॉन्स्टेबलने तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना या फोनची माहिती दिली, त्यानंतर एकच गोंधळ उडाला. पोलीस आणि यंत्रणांनी या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. आरोपींच्या शोधासाठी चार पथके तैनात करण्यात आली आहेत. सर्व्हेलन्स सेलच्या मदतीने धमकी देणाऱ्या व्यक्तीचा मोबाईल ट्रेस केला जात आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेतली जात आहे. सीएम योगी यांना यापूर्वीही धमक्या आल्या आहेत.

तक्रारीत काय म्हटले आहे?

चीफ कॉन्स्टेबल उधम सिंग यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, शनिवारी रात्री १०.०८ वाजता एक कॉल आला होता. फोन करणाऱ्याने सीएम योगींना बॉम्बने उडवले जाईल असे सांगितले. उधम सिंह यांनी फोन करणाऱ्याचे नाव विचारले असता त्याने फोन कट केला. त्यानंतर उधम सिंह यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली.

## पाकच्या...

अतिरेकी इस्लामिक विचार असलेल्या धर्मोपदेशकांना ब्रिटनमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. रविवारी याबाबत माहिती देण्यात आली.

परदेशातील सर्वात धोकादायक अतिरेकी प्रचारकांची ओळख पटवण्याचे काम अधिका-यांवर सोपवले जात आहे जेणेकरून त्यांना व्हिसा चेतावणी सूचीमध्ये जोडता येईल, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी याबाबत माहिती दिली. काही दिवसापूर्वी लंडनमध्ये सुनक यांनी भाषण दिल्यानंतर ही माहिती समोर आली आहे, यामध्ये त्यांनी देशाच्या लोकशाही आणि बहु-विश्र्वास मूल्यांना अतिरेक्यांकडून धोका असल्याचा इशारा दिला होता.

व्देष पसरविणा-यांना परत पाठवू

पंतप्रधान सुनक म्हणाले की, व्हिसावर राहणा-या लोकांना स्पष्ट सूचना दिल्या, त्यांना द्वेष पसरवायचा असेल किंवा आंदोलनादरम्यान लोकांना धमकावायचे असेल तर आम्ही त्यांचा येथे राहण्याचा अधिकार काढून घेऊ. इस्रायल-हमास युद्धाविरोधात रस्त्यावर उतरणा-या लोकांना सुनक यांनी हा इशारा दिला होता.

सर्वांनी एकत्र येण्याची वेळ

फुटीरतावादी शक्तींच्या विरोधात आता आपण सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे, जे आपल्यात फूट पाडू इच्छितात त्या अतिरेक्यांना तोंड द्यावे लागेल, असेही सुनक म्हणाले. पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ शनिवारी हजारो लोक लंडनच्या रस्त्यावर उतरले. या काळात शांतता भंग केल्याच्या आरोपावरून महानगर पोलिसांनी १२ जणांना अटक केली.

## स्टॅलिन...

अधिकाराचा गैरवापर केला

यावर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती सचिन दत्ता यांच्या खंडपीठाने म्हटले की, तुम्ही कलम १९ (१) अ आणि २५ अंतर्गत तुमच्या अभिव्यक्ती स्वातंर्त्याचा गैरवापर केला आणि आता तुम्ही सर्वोच्च न्यायालयाकडे दिलासा मागत आहात. तुम्ही सामान्य माणूस नाही, राजकारणी आहात. अशा वक्तव्यांचा परिणाम काय होईल, याचा विचार तुम्ही आधीच करायला हवा होता. सध्या न्यायालयाने पुढील आठवड्यापर्यंत सुनावणी पुढे ढकलली आहे.

## मनपाचे...

रुपये तर पाणीपुरवठा योजनेसाठी ही ५० लाख रुपये तरतूद मनपाने केली आहे.

पालिकेला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नामध्ये केंद्र शासनाच्या विविध अनुदानाचा वाटा ३५ टक्के तर राज्य शासनाकडून होणारी भांडवली जमा १७ टक्के अपेक्षित आहे. त्या खालोखाल कर्ज व निधीच्या माध्यमातून ११ टक्के, मालमत्ता पासून होणारे उत्पन्न ९ टक्के, विविध अनुदाने व अंशदानामधून सात टक्के तर पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या माध्यमातून सहा टक्के उत्पन्न अपेक्षित आहे. मनपाला मिळणाऱ्या करामधूनही सहा टक्के उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे.असाधारण ऋण व निलंबन जमा मधून पाच टक्के तसेच विशेष अधिनियमाखाली होणाऱ्या वसुलीतून दोन टक्का रक्कम जमा होणार आहे.

या वर्षात पालिका केंद्र शासनाचे विविध अनुदान खर्च करणार असून त्याचे प्रमाण ३३ टक्के आहे. त्या खालोखाल राज्य शासनाच्या भांडवली खर्चासाठी १९ टक्के खर्च होणार आहे.कर्ज व निधीसाठी ११ टक्के, असाधारण ऋण व निलंबन लेखेसाठी सहा टक्के खर्च होणार आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागासाठी पाच तर महसुली भांडवली खर्चासाठी चार टक्के खर्च केला जाईल.या खालोखाल तीन टक्के संकीर्ण खर्च,सार्वजनिक सुरक्षिततेसाठी एक टक्का खर्च होणार आहे.

आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी अंदाजपत्रक सादर करताना मुख्यलेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखापरीक्षक कांचन तावडे, लेखाधिकारी, समद शेख यांच्यासह पालेकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## विकास कामासाठी...

सभा मंडप बांधकाम करणे ५० लक्ष, प्रभाग क्र. २ मध्ये हणमंतवाडी तांडा येथे सभागृह बांधकाम करणे ३० लक्ष, प्रभाग क्र. ३ मध्ये प्रभु श्रीरामचंद्र मंदिर समोरील रस्ता सी. सी. रोड व नाली बांधकाम करणे ३० लक्ष, प्रभाग क्र. ५ मध्ये बळी कुरे ते सरवदे यांच्या घरापर्यंत सी.सी. रोड ब नाली बांधकाम करणे ३० लक्ष, रेणापुर नगर पंचायत अंतर्गत ईदगाह कंपाऊंड वॉल व लादीकरण करणे १ कोटी, याप्रमाणे १० कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे.

कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात रेणापूर येथील विविध भागातील सर्व स्थरातील नागरिकांच्या वतीने श्री गणेशाची चांदीची मूर्ती भेट देऊन यथोचित सत्कार करून जाहीर आभार व्यक्त केले याप्रसंगी भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास शेख शफी, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, चंद्रकांत कातळे, संतोष राठोड, उत्तम चव्हाण, मारूफ आतार, उत्तम घोडके, दिलीप चव्हाण, अंतराम चव्हाण, रमेश वरवटे, शेख अजीम, रमेश चव्हाण, सचिन सिरसकर, सुभाष राठोड, धम्मानंद घोडके, नंदकुमार बंडे, रोहित खुमशे योगेश राठोड, नागेश बस्तापुरे, मनोज चक्रे, गणेश माळेगावकर, सुरज फुलारी, पप्पू कुडके, जगन्नाथ कातळे, ज्ञानोबा सातपुते, शेख शहंशाह सोपान सातपुते, दत्ता कातळे, अमृत स्वामी, दिलीप चव्हाण, शांतिवीर क्षिरसागर, शंकर कापसे, सूर्यकांत कुडके, राजकुमार कुलकर्णी, श्रीराम पंचाळ, शेख खुद्दुस, शेख फतरू, करीम खरीद, अमिनसाब फरीद, जाहिरोद्दीन बावस्कर, शेख इस्माईल, अबूबुकर मौलाना, सुचिता क्षीरसागर, रेखा शिंदे, उषा मीठापल्ले, राधिका म्हेत्रे, श्रीशैल्य कुंभारे, रोहन पांचाळ, सुरेखा पंडित, साधू लोकरे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, अंगणवाडीच्या सेविका, मदतनीस सर्वसारातील नागरिक महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इस्त्रो...

ही गोष्ट समजली तेव्हा संपूर्ण कुटुंबाला धक्का बसला. मात्र आता असे काही नाही आहे. उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती सुधारली आहे. सध्या त्यांच्यावर औषधोपचार सुरू आहेत. या काळात सोमनाथ यांना त्यांचे कुटुंब आणि मित्रांनी खूप सहकार्य केले.


महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा**

**ई-निविदा ब-१ /सूचना क्रमांक एनएलजी क्र.१५/सन २०२३-२४(ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा - ४९३५२९ (दरुध्वनी क्रमांक ०२३८४-२४२१३८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गा तील नोंदणीकृत / अनोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे रस्ते बांधकाम व दुरुस्ती / इमारती बांधकाम व दुरुस्ती करण्यासाठी लातुर जिल्हयातील निलंगा/देवणी/शिरुर अनंतपाळ तालुक्यातील कामासाठी मागवित आहेत. या निविदे अंतर्गत संपुर्ण माहीती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर निविदेमध्ये कांही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक ०५/०३/२०२४ ते १२/०३/२०२४ वेळ १८:५५ पर्यन्त राहील. उपरोक्त एकत्रित कामाची निविदा किमंत रुपये १.०० कोटी पेक्षा जादा आहेत.

**http://www.mahapwd.gov.in,**
**http://mahatenders.gov.in**

**स्वाक्षरीत**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा**



**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER-PATHAN SHARIFA BEGUM SHAFIULLAHKHAN TO: PATHAN SHARIFA SHAFIULLAKHAN HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE PATHAN SHARIFA SHAFIULLAKHAN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
PATHAN SHARIFA BEGUM SHAFIULLAHKHAN

**NEW NAME**
PATHAN SHARIFA SHAFIULLAKHAN

**ADDRESS**
KATGAR GALLI AUSA DIST LATUR 413520



**सुर्य कल्याण मुंबई रात्र**

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार

**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | | ३६-६७ | | ८०-०४ |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | | ०१-१४ | | ७८-८६ |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी

संपर्क करा

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा-९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**


| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे

99 75 47 98 26




# यशवंत

मंगळवार दिनांक ५ मार्च २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## ५ मार्च ते १३ मार्च २०२४
## श्री.स्वामी समर्थ विजयरथ उदगीरात




**उदगीर (प्रतिनिधी)** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री.क्षेत्र त्रिंबकेश्वर संचलित श्री. स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा व संस्कार केंद्र जय हनुमान पांडुरंग मंदिर अग्निशामक दलाच्या पाठीमागे बिदर नाका मादलापूर तालुका उदगीर जिल्हा लातूर या केंद्रात ८ मार्च २०२४ वार शुक्रवार या दिवशी त्र्यंबकेश्वर येथील श्री.स्वामी समर्थ विजय रथाचे आगमन महाशिवरात्री सणाच्या दिवशी होणार असून या विजय रथाचा सर्व उदगीर शहरातील व मादलापूर परिसरातील सर्व भाविक भक्तांनी दर्शनाचा व पूजेचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री.स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्र मादलापूर केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. या विजय रथाच्या आगमनामुळे या केंद्रात त्रिकाल आरती संपन्न होणार असून सकाळी ८:००, सकाळी १०:३० ते सायंकाळी ६ :३० पर्यंत हा सोहळा संपन्न होणार आहे. श्री स्वामी समर्थ पादुका पूजनासाठी पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे. पूर्व नाव नोंदणीसाठी संपर्क मोबाईल क्रमांक ८२०८१४२१७३,९१७५६२४९१ २,८९९९४७३५४७.

# लातूर ग्रंथोत्सवाचे थाटात उद्घाटन
# *ग्रंथ हे आपल्या जीवनात मार्गदर्शकाची भूमिका बजावितात - रमेश बियाणी*








**उदगीर (प्रतिनिधी)** ग्रंथ हे आपल्याला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळविषयक ज्ञान देतात. आपली संस्कृती, समाजाची जडणघडण ग्रंथांमुळे समजते. त्यामुळे ग्रंथ हे मानवी जीवनात मार्गदर्शकाची भूमिका बजावितात, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी केले. दयानंद सभागृहात लातूर ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लातूर ग्रंथोत्सवचे उद्घाटन ग्रंथालय चळवळीचे प्रणेते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार भारत सातपुते हे होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के, ज्येष्ठ साहित्यिक रमेश चिल्ले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, जिल्हाध्यक्ष प्रभाकर कापसे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, साने गुरूजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कालिदास माने आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मानवी जीवनात प्रगतीचे विविध टप्पे आले. या सर्व टप्प्यांचे ग्रंथ हे साक्षीदार आहेत. आपली संस्कृती, सभ्यता विकसित होण्यामध्ये ग्रंथची भूमिका महत्वाची राहिली आहे. आपल्या विचारांची जडणघडण होण्यामध्ये ग्रंथ दिशादर्शक ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने ग्रंथ वाचनाची आवड जोपासली पाहिजे. ग्रंथोत्सवासारखे उपक्रम हे वाचन चळवळ वाढविण्यासाठी आणि युवा वर्गात वाचनाची गोडी वाढविण्यासाठी आवश्यक असल्याचे श्री. बियाणी यावेळी म्हणाले.

आयुष्यात ग्रंथ हा महत्वाचा घटक आहे. ग्रंथांशी घट्ट मैत्री केल्यास आपल्याला जगण्याचे बळ, नवी दिशा आणि नव्या प्रेरणा मिळतात. त्यामुळे आयुष्यात इतर अनावश्यक बाबींपेक्षा ग्रंथ वाचनाला अधिक महत्व दिले पाहिजे, असे कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आपल्या जीवनातील ग्रंथांची भूमिका विषद केली.

वाचकांची मानसिकता बदलत असून वाचन चळवळ वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने स्वतःपासूनच ग्रंथ वाचनाची आवड जोपासण्यास सुरुवात करावी. प्रत्येकाच्या अभिरुचीनुसार ग्रंथ वाचनालयात उपलब्ध करून द्यावे लागतील. ग्रंथालय हे केवळ पुस्तकालय न बनता ग्रंथालयांनी वाचन प्रसारासाठी नवनव्या उपक्रमांशी जोडून घ्यावे. आव्हाने सर्वच क्षेत्रात आहेत, वाचन चळवळ त्याला अपवाद असण्याचे कारण नाही, असे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यावेळी म्हणाले.

युवा पिढीला वाचनाची गोडी लावण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांमार्फ़तगावोगावी उपक्रम राबविले जावेत. याग्रंथालयांनीवाटाड्याची भूमिका निभावत वाचक घडवावेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाल्यास वाचन चळवळ वाढीस लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तिकांसोबत इतरही वाचनासाठी प्रोत्साहित करावे, असे बाल साहित्यकार रमेश चिल्ले यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी केले. यामध्ये त्यांनी ग्रंथोत्सवाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलनपी.सी.पाटील यांनी तर आभार प्रदर्शन हरिश्चंद्र डेंगळे यांनी केले. ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. यामध्ये विविध प्रकाशनांच्यावतीने ग्रंथदालने उभारण्यात आली आहेत. या ग्रंथदालनामधून विविध प्रकारचे ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

ग्रंथदिंडीने उत्साहात सुरुवात लातूर ग्रंथोत्सवची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपासून झाली. ग्रंथदिंडीचे पूजन जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. आरती झंवर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, जिल्हा ग्रंथिलय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, हावगीराव बेरकिळे, प्राचार्य डी.एन. केंद्रे, कालिदास माने, राम मोतीपवळे, काशिनाथ बोडके, गोकर्ण संजय सुर्यवंशी, अनिल पाटिल, गुप्तलिंग स्वामी, श्रीधर स्वामी, किरण बाभळसुरे, ग्रंथालय निरिक्षक हरिचंद्र डेंगाळे, हिरालाल पाटिल. ग्रंथदिंडीत साने गुरुजी विद्यालय, राजमाता जिजामाता विद्यालय, श्री विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने विविध वेशभूषेत सहभागी झाले होते. या ग्रंथदिंडीने लातूर शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले.

## घोणसी मंडळात स्वीप कार्यक्रम अंतर्गत मतदार जागृती रॅली




**जळकोट (माधव होनराव)** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रक्रियेमध्ये जळकोट तालुक्यातील अतनूर परिसरातील व मेवापूर, चिंचोली मतदारांचा सहभाग आढावा, मतदारांना मतदानाचे महत्त्व व आवश्यकता यांची जाणीव व्हावी यासाठी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने उदगीर विधानसभा मतदारसंघ ( अनुसूचित जाती ) अंतर्गत जळकोट तालुक्यातील अतनूर परिसरातील मेवापूर, चिंचोली येथे मतदार जनजागृती ( स्वीप ) अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत येथे मतदार जागृती करण्यात आली. तहसीलदार सुरेखा स्वामी यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सर्व गावातील नागरिकांना आपला मतदानाचा अधिकार मतदानाच्या वेळी वापरण्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. गावात मतदान करण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी रॅली काढून गावात मतदानाबद्दल वातावरण निर्मिती करण्यात आली. येथे गटचर्चाही घडविण्यात आली. मतदानास अधिक प्रतिसाद मिळावा व उद्देश सफ़ल व्हावा यासाठी तहसीलदार सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार संतोष गुट्टे, नायब तहसीलदार जी. एल. खरात, मंडळाधिकारी कमलाकर पन्हाळे, राजेंद्र कांबळे, तलाठी आतिक शेख, लिपीक रऊफ़ शेख, डाटा ऑपरेटर अलीम शारवाले, बालासाहेब गोविंदराव शिंदे, सरपंच कोमल तुळशीदास पाटील, तुळशीदास पाटील, अमोल गायकवाड, मुख्याध्यापक नारायणपाटील, चिंचोलीचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील बाबूराव बेळकुंदे आदिनी परिश्रम घेतले.

## उदयगिरीच्या इनडोअर स्टेडियमला ॲड. आशिषजी बाजपाई यांची सदिच्छा भेट



**उदगीर (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. आशिषजी बाजपाई यांनी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील इनडोअर स्टेडियमला भेट देऊन खेळाडूंना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी आशिषजी बाजपाई यांचा शाल, बुके देऊन सत्कार केला. याप्रसंगी डॉ. मल्लेश झुंगास्वामी, डॉ. गौरव जेवळीकर, क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे उपस्थित होते. तसेच खेळाडूंच्यापालकांपैकी डॉ. प्रवीण मुंदडा, प्रा. रामदास मलवाडे, इमरान शेख, श्री. विश्वनाथ पाटील, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तानाजी चेरले आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बाजपाई यांनी प्रशिक्षक ओवस कमाल व नागेश चामले यांनाही पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रासेयो जिल्हास्तरीय युवक युवती नेतृत्व शिबिरात उदयगिरीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवायोजनेच्याविद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना जिल्हास्तरीय युवक युवती नेतृत्व विकास शिबिरात सहभाग नोंदवला. दि. २६ फ़ेब्रुवारी ते १ मार्च २०२४ या कालावधीत दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथे सदरील शिबिर पार पडले. यामध्ये ओंकार स्वामी, श्रुती कवठाळे, साक्षी कलाले आणि रेणुका देवी या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के.मस्के यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी एनएसएस चे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बी. एस.होकरणे, प्रा.डॉ.बी. एस.कांबळे, प्रा.डॉ. एस.व्ही.भद्रशेट्टे हे उपस्थित होते.